# हाकारा

वर्ष सतरावे • अंक चौथा

ऑक्टोबर - डिसेंबर १९९६

हाकारा

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

स्फूर्तिस्थान / प्रेरणा : *कै. प्रा. गं. बा. सरदार*

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. पां. वा. सुखात्मे |
| उपाध्यक्ष | : | प्रा. व्ही. जी. पेंढारकर |
| मुख्य सचिव | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| खजिनदार | : | डॉ. व्ही. एस. कुलकर्णी |
| सभासद | : | डॉ. एन. एस. देवधर |
| | : | डॉ. बी. व्ही. भानू |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | डॉ. एस. जी. देवगावकर |
| | : | ॲड. पद्माकर वळवी |

# सूची


| | |
|---|---|
| अंक पहिला : जानेवारी -मार्च | १९८० - जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल-जून | १९८० - आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर | १९८० - आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० - आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी-मार्च | १९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| अंक सहावा : एप्रिल-जून | १९८१ - आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै-सप्टेंबर | १९८१ - रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी-मार्च | १९८१ - उत्ताराखंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल-जून | १९८२ - धरणे व विकास |
| अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर | १९८२ - जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी-मार्च | १९८३ - आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल-जून | १९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर | १९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-आठरा : जानेवारी-जून | १९८४ - आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर | १९८४ - आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८४ - आदिवासी आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी-मार्च | १९८५ - आदिवासी संघटन |
| अंक बाविसावा : एप्रिल-जून | १९८५ - जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८५ - आदिवासी महिला |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८५ - आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च | १९८६ - जंगल व धरण |
| अंक सव्विसावा : एप्रिल-जून | १९८६ - आदिवासी कला |
| अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८६ - आदिवासी व वेठबिगारी |
| अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय |
| अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च | १९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न |
| अंक तिसावा : एप्रिल-जून | १९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल |
| अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न |
| अंक तेहतीस : जानेवारी-मार्च | १९८८ - सवलती अपहरणाची समस्या |
| अंक चौतीस : एप्रिल-जून | १९८८ - आदिवासी साहित्य |
| अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८८ - आदिवासी समाज व संस्कृती |
| अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून | १९८९ - डॉ. वेरीअर एलवीन विशेषांक |
| अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर | १९८९ - व्यवसाय मार्गदर्शन |
| अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून | १९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती |
| अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर | १९९० - जागतिक आदिवासी |
| अंक चव्वेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर | १९९० - गं. बा. सरदार स्मृति विशेषांक |
| अंक पंचेचाळीस-सेहेचाळीस : जानेवारी-जून | १९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक |
| अंक सत्तेचाळीस : जुलै-सप्टेंबर | १९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या |
| अंक अठ्ठेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर | १९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती |
| अंक एकोणपन्नास-पन्नास : जानेवारी-जून | १९९२ - सर्वसाधारण आदिवासी |
| अंक एक्कावन-बावन : जुलै-डिसेंबर | १९९२ - अनुताई वाघ विशेषांक |
| अंक त्रेपन-चोपन्न : जानेवारी-जून | १९९३ - आदिवासी धर्म, सण व उत्सव |
| अंक पंचावन-छप्पन : जुलै-डिसेंबर | १९९३ - धरण-विस्थापन व पुनर्वसन |
| अंक सत्तावन : जानेवारी-मार्च | १९९४ - सर्वसाधारण अःदिवासी |
| अंक अठ्ठावन्न : एप्रिल-जून | १९९४ - आदिवासी एकता परिषद |
| अंक एकोणसाठ : जुलै-सप्टेंबर | १९९४ - आदिवासी विकासाची सैद्धान्तिक भूमिका |
| अंक साठ : ऑक्टोबर - डिसेंबर | १९९४ - आदिवासी जमाती |
| अंक एकसष्ठ - बासष्ठ : जानेवारी - जून | १९९५ - राणीपूर विशेषांक |
| अंक त्रेसष्ठ : जुलै-सप्टेंबर | १९९५ - कुपोषण विशेषांक |
| अंक चौसष्ठ : ऑक्टोबर - डिसेंबर | १९९५ - पर्यावरण विशेषांक |
| अंक पासष्ठ : जानेवारी - मार्च | १९९६ - आदिवासी जमाती |
| अंक सहासष्ठ : एप्रिल - जून | १९९६ - महाराष्ट्र, ओरिसा अभ्यास दौरा |
| अंक सदुसष्ठ : जुलै - सप्टेंबर | १९९६ - आदिवासी जमाती |

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

Printed by Jnana Prabodhini Mudran Vibhag, - 30.

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक**

# हाकारा

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | संपादकीय | | २ |
| १. | वनवासी हिन्दुत्ववाद्यांची संकल्पना | : एल. के. मडावी | ३ |
| २. | आदिवासींच्या शिक्षणातील अडथळा - भाषा | : डॉ. प्र. ल. गावडे | ११ |
| ३. | अपेक्षित तरीही अपूर्व 'आदिभारती' | : वरूणराज भिडे | १५ |
| ४. | कथा - आकाशी झेप घे रे पाखरा .... ! | : लक्ष्मण ढवळू टोपले | २१ |
| ५. | आदिवासी आश्रमशाळा आणि त्यांची वाटचाल | : डी. बी. मंडाले गुरूजी | २६ |
| ६. | पुस्तक परिचय - 'अहेर' कथा संग्रह | : मुक्ता सर्वगोड | २८ |
| ७. | कविता - शहीदवीर सेडमाके बाबूरावजी | : डी. बी. मंडाले गुरूजी | ३० |
| ८. | कविता - बापूच्या देशात | : सोपान सुरकुले | ३१ |
| ९. | संपादकास पत्र | | ३२ |


वर्ष सतरावे : अंक -चौथा
ऑक्टोबर - डिसेंबर १९९६

**मूल्य रू. १५/-**

**पत्र्यव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ३८७२१९

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
पुरुषोत्तम आगाशे

**अक्षरजुळणी**
सन ग्राफीक्स्
दत्तवाडी, पुणे ३०.
फोन : ५३०१६२

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग
५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०.
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय

*आजपर्यंत आदिवासी जमाती डोंगर, दऱ्याखोऱ्यातून जंगलाच्या सान्निध्यामध्ये रहात आल्या आहेत. आदिवासी म्हणजे 'मूळचे निवासी' असे काही संशोधकांचे मत आहे. मात्र आदिवासी भागात कार्य करणाऱ्या काही संस्था, संघटना आदिवासींना कटाक्षाने 'वनवासी' अथवा 'गिरीजन' असेच संबोधतात. भारतीय घटनेतसुद्धा आदिवासी जमातींचा 'अनुसूचित जमाती' असा उल्लेख केला आहे. त्यामुळे गोंधळाचे चित्र निर्माण झाले आहे. आदिवासींपुढे आपण कोण? आदिवासी, वनवासी का गिरीजन? असा स्वअस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रश्नाचा वेध घेण्याचा प्रयत्न एल. के. मडावी यांनी आपल्या लेखातून केला आहे.*

*भाषा हे संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम आहे. आदिवासी भागामध्ये आता शिक्षणाचा सर्वदूर प्रसार झाला आहे. मात्र आदिवासी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीत भाषा हा महत्वाचा अडथळा ठरत आहे. कारण घरामध्ये बोलली जाणारी भाषा एक तर शाळेमध्ये शिकवली जाणारी भाषा वेगळी. या शैक्षणिक समस्येचा ऊहापोह ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र. ल. गावडे यांनी आपल्या लेखातून केला आहे. १९७५ साली 'आदिवासी बोलीभाषा प्रकल्प' सुरू झाला. या प्रकल्पाअंतर्गत आदिवासी भागातील प्राथमिक शिक्षण घेणे सोयीचे जावे म्हणून त्यांच्या बोलीभाषेतील पुस्तके निर्माण केली गेली आहेत. 'आदिभारती' नावाने बाजारात आलेल्या या नावीन्यपूर्ण पुस्तक प्रकल्पाचा आढावा श्री. वरूणराज भिडे यांनी आपल्या लेखातून घेतला आहे.*

*आश्रमशाळेतील निरनिराळ्या समस्यांवर श्री. डी. बी. मंडाले गुरूजी यांनी आपल्या लेखातून चर्चा केली आहे. याशिवाय श्री. लक्ष्मण टोपले यांची कथा, श्री. सोपान सुरकुले यांची कविता तसेच 'अहेर' या कथासंग्रहाचा पुस्तक परिचय देखील आहे.*

*'हाकारा' चा हा अंक सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना मार्गदर्शन करणारा व सर्वसामान्यांना उद्बोधक ठरणारा आहे. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात.*

**- रा. के. मुटाटकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# 'वनवासी' हिन्दुत्ववाद्यांची संकल्पना

- एल. के. मडावी

ख्रिश्चन मिशनऱ्यांनंतर, गांधीवादी व साम्यवादी संघटनांनी अदिवासी क्षेत्रात कार्य केले. अलिकडील काळांत हिन्दुत्ववादी संघटनांनी आदिवासींमध्ये कार्य सुरू केले आहे. आदिवासी क्षेत्रात काम करण्याच्या, त्यांच्या प्रेरणा, अर्थातच भिन्न आहेत. ख्रिश्चन मिशनरी आणि हिन्दुत्ववादी संघटनाद्वारे कार्य करीत असतांना, त्यांनी आपआपल्या उद्देशपूर्तीच्या प्रक्रियेतून आदिवासी समाजावर वेगवेगळे पैलू टाकल्याचे स्पष्ट जाणवते. परिणामी या चळवळीद्वारा अदिवासींचे उत्थान करण्याऐवजी, अधोगतीच झाल्याचे चित्र उभे राहते.

हिन्दुत्ववादी चळवळीद्वारा, आदिवासीला आदिवासी म्हणण्याऐवजी, 'वनवासी' असा शब्द प्रयोग करतात. 'वनवासी' ही मूळची संकल्पना हिन्दुत्ववाद्यांच्या पौराणिक व धार्मिक ग्रंथाच्या गाभाऱ्यातून उगम पावते. ''हिन्दुत्ववाद्यांच्या म्हणण्यांनुसार आदिवासींना आदिवासी म्हटल्याने 'ते' व 'आपण' यांच्यात एक दुरावा निर्माण होतो. आदिवासी म्हणजे मूळचे रहिवासी, व आपण नंतरचे म्हणजे 'उपरे' हा दुजाभाव 'वनवासी' या शब्दाने नष्ट होतो. परिणामी सामाजिक अभिसरणांची प्रक्रिया सुकर होते. म्हणून आदिवासीपेक्षा 'वनवासी' अधिक योग्य,'' असे हिन्दुत्ववाद्यांना वाटते. (आपल्या राजकीय मानसिकतेची पोत - प्रा. सुमंत यशवंत-यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ)

'वनवासी' म्हणजे केवळ वनांत हाकलले. किंवा 'दंड स्वरूपात वनांत पाठविलेले' असा अर्थबोध होतो. वनात राहणारे 'वनवासी' असे म्हटल्यास पूर्वी सर्वच लोक जंगलात राहत होते, म्हणजे आदिवासींसह सर्वच जण वनवासी का नाही? सर्वच आदिवासी वनांत राहत नाही. काही आदिवासी शहरात राहतो. म्हणजे शहरात राहणारा आदिवासी तो आदिवासी व त्यांचेच आप्त बहीणभाऊ, आईवडील हे वनांत (खेडेगावात) राहतात ते 'वनवासी'? म्हणजे शहरातला आदिवासी व खेडेगावातला 'वनवासी', असा सरळ सरळ आदिवासींमध्ये भेद निर्माण करण्याचे ब्राम्हण्यवाद्यांचे डावपेच 'वनवासी' या संकल्पनेतून साकार होतात.

हिन्दुत्ववादी साहित्यामध्ये नमूद करण्यात आलेल्या 'वनवासी' या शब्दप्रयोगातून 'शिक्षा' किंवा दंड असा अर्थबोध होतो. महाभारताच्या कथेनुसार पांडवांना, तर रामायणाच्या कथेनुसार रामास, वनवासांत पाठविण्यात आले. या वनवासाची भूमिका म्हणजे पांडवास व रामास ठोठावलेली शिक्षा किंवा दंड अशीच आहे.,

आदिवासी माणसाला बाहेरच्या जगाबद्दल जेवढे अज्ञान आहे, तेवढेच अज्ञान आदिवासींबद्दल बाहेरच्या जगाला आहे. या अज्ञानाचा फायदा घेवून माणसांसारखा माणूस तोही या भूमीवरच निसर्गत: नागरिक असलेल्या, आदिवासींचा विसर जनसामान्यांत पडावा या दुरगामी संकल्पनेतून आदिवासींचे 'वनवासीकरण' करणे सुरू आहे. 'वनवासी' हा शब्दप्रयोग आदिवासीला हीन लेखण्यासाठी केलेली साजीश आहे.

नाहीतर हिन्दुत्ववाद्यांची भावना आदिवासींबद्दल नीच अशी आहे. त्यांच्या मते आदिवासी म्हणजे

'वनवासी', तुच्छ, अफाट विश्वपटलांवरचा काळाकुट्ट डाग. पौराणिक वाङमयातही आदिवासींबद्दल तुच्छतेने शब्दप्रयोग करून 'जंगली' तर कधी 'धरतीचे पापी प्राणी' म्हटले आहे. काळ्याहून काळे म्हणजे आदिवासी असे सर्वश्रृत आहे. भारतात काळ्या रंगाचे आदिवासी राजे होते. ते अतिशय समृद्ध होते. त्यांची स्वतःची नगर राज्ये होती. त्यांचे राजवाडे, किल्ले, ऐतिहासिक गड आजही अस्तित्वात आहेत. तिथे वास्तव्य करणाऱ्या आदिवासी राजांना 'वनवासी' म्हणायचे काय?

## हरिजन, गिरीजन, वनवासी - एकाच कळीचे शब्द :

गांधीवाद्यांकडून, अस्पृश्यांना 'हरिजन'[१] आणि आदिवासींना 'गिरीजन'[२] म्हटले जात असे. हरिजन व गिरीजन हे दोन्ही शब्द येथील मूळनिवासीयांचे अस्तित्व नाकारणारे आहे. 'हरिजन' म्हटल्याने अस्पृश्यांचे (आजचा आंबेडकरी) अस्तित्व नाकारण्यात येते, म्हणून 'हरिजन' शब्दप्रयोगांवर कायद्याने बंदी घातली. आदिवासीला 'गिरीजन' म्हटले गेले, आणि 'गिरीजन' या शब्दप्रयोगाचे सुधारीत स्वरूप म्हणजे 'वनवासी' होय. आदिवासीला 'वनवासी' म्हटल्याने आदिवासींची संस्कृती, परंपरा, भाषा व जीवन जगण्याची पध्दती डोळ्यासमोर काहीच उभी राहत नाही. वनवासी म्हटल्याने आदिवासींचे अस्तित्व नाकारले जाते. आदिवासीला 'वनवासी' म्हटल्याने आदिवासी संस्कृतीचा अपमान होतो.

'हरिजन' व 'गिरीजन' या शब्दप्रयोगामागची भूमिका म्हणजे अस्पृश्यांना व आदिवासींना, त्यांच्या स्वजातीची / गणांची हीनता, त्यांच्या लक्षातच येवू नये, यासाठी केलेला प्रयत्न आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, गुलामीची हीनता गुलामांना समजली पाहिजे. म्हणजे ते गुलामीची सुत्रे नाकारून, गुलामीच्या विरूद्ध बंड करून उठेल. हिन्दुत्ववाद्यांच्या विरूद्ध बंड होवू नये याची पुरेपूर दक्षता घेवून 'हरिजन' व 'गिरीजन' असे शब्द प्रयोग करण्यात आले. असे हे 'हरिजन' 'गिरीजन' व 'वनवासी' एकाच कळीचे शब्द आहेत.

## वनवासी कल्याण आश्रम चळवळ

'अमरावतीकर डॉ. हेडगेवार शिष्य, बाळासाहेब देशपांडे यांनी काशी विश्व हिन्दु विद्यापीठांतून वारसा घेवून, राष्ट्रीय स्वयंसेवक प्रणालीत हिन्दुत्ववादांचा वारसा घेवून, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक श्री. गुरूजी यांच्या प्रेरणेतून १९ डिसेंबर १९५२ ला वनवासी कल्याण आश्रम संस्थेची स्थापना केली. [३]

---

*१) हरिजन - Indian national leader, devout Hindu and "Social reformer' Mohandas K. Gandhi called them "Harijan; meaning children of God. (Dalit Voice April 16-30-1988)*

*२) गिरीजन - आदिवासींना, म.गांधींनी गिरीजन म्हटले आहे. गिरी म्हणजे पर्वत (जंगल) व जन म्हणजे लोक. जंगलात पाठविलेले लोक म्हणजे 'वनवासी'. गिरीजन शब्दात गिरीजा आणि जन हे दोन्ही शब्द आहेत. गिरीजा म्हणजे शिवाची पत्नी. गिरीजाला देवीचे स्थान दिले. जन म्हणजे लोक देवीचे पूत्र म्हणजे 'गिरीजन'.*

*३) वनवासी कल्याण आश्रम संस्थेची, शाखा गडचिरोली जिल्ह्यात सक्रिय कार्यरत असून, आदिवासींचे सर्रास वनवासीकरण सुरू आहे. ''आमचे गावी, आमचे सरकार' त्यांचाच उपक्रम आहे. दिक्षित गुरूजी, डॉ.बंग, बाबा आमटे, प्रकाश आमटे, यांनी आदिवासींचे वनवासी करणाचे जणू व्रतच घेतले आहे.*

(आदिवासी विकासाचे शिल्पकार - डॉ. गोविंद गारे) आदिवासींमध्ये हिन्दुत्ववाद पसरविण्यासाठीच, वनवासी कल्याण आश्रम संस्था निर्माण करण्यात आली.

बाळासाहेब देशपांडे यांनी वनवासी कल्याण आश्रम चळवळीमधून गांधीवादी विचारसरणीही रूजविण्याचे कार्य हाती घेतले. गांधी शिष्य ठक्करबाप्पा यांनी तयार करून दिलेल्या योजनेची अंमलबजावणी स्वयंसेवी पातळीवरून करण्यासाठी, मध्यप्रदेश सरकारने बाळासाहेब देशपांडे यांची नियुक्ती केली होती. त्यावेळी भारताला नुकतेच स्वातंत्र्य मिळाले होते. इंग्रजांच्या गुलामगिरीच्या श्रृंखलातून मुक्त झाल्यानंतर, हजारो वर्षापासून होत असलेल्या हिन्दुत्ववाद्यांच्या शोषणांतूनही मुक्त होण्यासाठी, काही आदिवासींनी इसाई धर्मात प्रवेश करण्याचे सत्र चालू केले होते. त्यामुळे हिन्दुत्ववादी नेत्यांना जबरदस्त धक्का बसला होता. हिन्दु धर्माला नकार देवून पूर्ण गावचे गाव ईसाई धर्मात प्रवेश करण्याच्या आदिवासींच्या कृतीबाबत, गाभिर्याने नोंद घेवून, हे आदिवासीचे कृत्य राष्ट्रघातकी असल्याचे हिन्दुत्ववाद्यांनी जाहीर केले.

आदिवासी माणूस जसा इंग्रजांविरूद्ध बंड करून उठला होता, तसाच या देशातील हिन्दुत्ववादी परंपरा, अंधश्रध्दा, वर्णवाद, सामाजिक विषमता, धर्म संकल्पना नाकारू लागला होता. ''जय हिन्दुस्थान' म्हणण्याचे ऐवजी, 'जय येशू' जय इसाईस्थान' असे नारे देत होता. भजन, कीर्तन, पूजाअर्चा, हिन्दुचे देवदेवता, व धर्मशास्त्र नाकारण्यास सिध्द झाला होता. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या हिन्दूच्या नेत्यांपैकी बाळासाहेब देशपांडे यांनी ''एका हातात लाऊडस्पिकर व दुसऱ्या हातात 'वेत' घेवून, मी तीनवेळा 'जयहिन्दचा' नारा देतो, तिसऱ्या नाऱ्यापूर्वी 'जयहिन्दला प्रतिसाद नाही मिळाला तर फोडून काढीन'', (आदिवासी विकासाचे शिल्पकार - डॉ. गोविंद गारे) अशा आदिवासींना धमक्या देऊन, 'जयहिन्द' म्हणण्यास भाग पाडीत असे.

आदिवासीच्या अज्ञानांची नाडी, देशपांडे यांनी अचूकपणे पकडली, आणि आदिवासीमध्ये मिसळून 'वनवासी सेवा आश्रमाची' संकल्पना संघप्रणलित, देशपांडे यांनी मांडली. १९५२ पासून संघाच्या प्रत्येक सदस्यांनी आदिवासीमध्ये 'वनवासी' नावाचे जबरदस्त असे प्रस्ताव निर्माण केले. आदिवासीला अस्तित्वहीन बनविण्यासाठी वनवासी सेवा आश्रमाद्वारे, आदिवासींच्या प्रत्येक भागात चळवळी उभ्या केल्या. छात्रवास, चिकित्सालये, जाणीव केंद्रे, धर्मजागरणपर्व, भाव-जागरण ही शक्तीशाली केंद्रे उभारली. तसेच 'वनवासी' या नावाने प्रौढशिक्षण केंद्रे, बालमंदिरे, वसतीगृहे, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, ग्रंथालये, गोशाळा, उच्च माध्यमिक शाळा, औद्योगिक केंद्रे, भजन मंडळे, पूर्णवेळ महिला कार्यकर्ता संस्कार केंद्रे, पूर्णवेळ पुरूष कार्यकर्ता व पूर्णवेळ वनवासी कार्यकर्ता नेमून, आदिवासींमध्ये 'वनवासी' संकल्पनेचे मायाजाळ उभे केले. प्रत्येक आदिवासीला वनवासी बनविण्यासाठी संघ परिवारांच्या सर्व-सदस्यांनी शपथ घेवून, वनवासी करणाचा एकसूत्री कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे येणाऱ्या पुढील १०० वर्षात या देशातला एकही आदिवासी माणूस आदिवासी म्हणून सापडणार नाही. सापडेल तो फक्त 'वनवासी'!

## मा. गो. वैद्य म्हणतात आदिवासी छे ! वनवासी

चित्रकोट हे बस्तर मधील, इंद्रावतीच्या सुंदर धबधब्यावर वसले आहे. तिथे वनवासी आश्रम शाळेचे वसतीगृह आहे, त्या वसतीगृहात छत्तिसगढी

आदिवासी विद्यार्थी राहतात. ऑक्टोबर १९९१ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक कार्यांच्या छत्तीसगडमधील मा. गो. वैद्यानी, त्या वसतीगृहाला भेट दिली. आश्रम शाळेच्या वसतीगृहात राहणाऱ्या मुलांशी ओळख करून घेतली. त्या मुलांमध्ये अर्ध्याहून अधिक मुले 'कश्यप' आडनांवाचे होते. कुणीतरी ते मा. गो. वैद्याचेच वंशज आहेत, अशी त्यांना (मा. गो. वैद्यांना) जाणीव झाली म्हणून मा. गो. वैद्य म्हणतात की, ''हे म्हणे आदिवासी! आणि आम्ही? कुठंतरी परक्या मुलूखातून आलेले आक्रमक या आदिवासींना जिंकून जंगलात हाकलून देणारे! असेच आम्हाला इंग्रजांनी शिकविले, आणि स्वातंत्र्यानंतरही आम्ही तीच पोपटपंची चालू ठेवली. इंग्रजांनी, अमेरिकेत आणि ऑस्ट्रेलियांत, न्युझीलंडमध्ये जशी, तेथील मूळनिवासीयांची ससे-होलपट केली, या मताचे बिजारोपण केले, आणि आम्ही ते मान्य केले. म्हणून आदिवासी शब्द रूढ झाला. जुन्या साहित्यांत तो शब्दच नाही.'' (दैनिक तरूण भारत दि. २०/१०/१९९१) हा उतारा स्वत: मा. गो. वैद्यांनी लिहिलेल्या लेखातून घेतला आहे. त्याच्याही समोर जावून वैद्यांसमोर एक बलाढ्य पर्वतांसारखा प्रश्न उभा राहतो तो म्हणजे'' ते आदिवासी, तर आम्ही कोण?'' या प्रश्नांचे उत्तर, त्यांना अजूनही सापडले नसल्यामुळे ते पुढे म्हणतात की, तथाकथित आर्यांनी आक्रमण केले. तथाकथित या शब्दांतून आर्य व आदिवासींचा संघर्ष झालाच नाही, हे सांगून सत्य लपविण्यांचा वैद्यांचा प्रयत्न आहे. त्याहीपलीकडे, वैद्य साहेब आणि संघ परिवारातील मंडळी फक्त विदेशातील आदिवासींना मूळनिवासी म्हणून मान्य करतात. पण भारतीय आदिवासींना 'मूळचे निवासी' म्हणून मान्य करण्यांसाठी त्यांचा कलेजा थरथर कापतो. आदिवासीला मूळनिवासी म्हणून व्याख्याबद्ध करण्याऐवजी चक्क त्यांना वनवासी बनविण्याचे सर्वंकष प्रयत्न झाले आहे. आदिवासींना वनवासी बनविण्याची संघ परिवाराची जाणिवपूर्वक कृती म्हणजे आदिवासींना हिन्दुधर्माच्या चादरीमध्ये लपेटण्याची प्रक्रिया होय.

## गोळवलकर गुरूजीचे आदेश आर्य बाहेरून आलेच नाही.

गोळवलकर गुरूजीचे , संघपरिवारांना आदेश सुटले आहेत की, आर्य हे याच देशातले असून, ते बाहेरून आलेच नाही. गुरू गोळवलकराचा वंशवारसा चालविणारे बाळ गंगाधर टिळकांनी, आर्य बाहेरून आल्याची संकल्पना मांडली होती. त्याच बरोबर आर्य बाहेरूनच आले याबाबत पाश्चिमात्य देशासह अनेक विद्वानांनी आपआपली मते मांडली आहेत. मात्र गोळवलकर व संघवाले आर्य बाहेरून आलेच नाही असे सांगून, बाळ गंगाधर टिळक खोटे असल्याचे सिध्द करू पाहत आहेत.

आर्य बाहेरून आले नाही, असा संघपरिवाराचा अट्टाहास कां? याचे अगदी साधे व सरळ उत्तर आहे की, आदिवासीला आदिवासी किंवा 'मूळनिवासी' म्हटल्याने, ते या भूमिवरच मूळचे असा अर्थबोध होवून, आर्य हे 'उपरे' ठरतात. आर्य बाहेरून आले असे म्हणणे म्हणजे आपण उपरे होतो, या भितीपोटी आपण येथीलच आहोत असा दावा करीत असून, आदिवासींच्या मनामध्ये, आपल्या मूळत्वाची भावना निर्माण होवू नये म्हणून त्यांना वनवासी बनविणे सुरू आहे.

## वनवासीकरण व आरक्षणाला विरोध एकच सूत्र

आदिवासींचे वनवासीकरण करण्याची प्रक्रिया दूरगामी परिणाम करणारी आहे. हजारो वर्षापासून

दबलेल्या समाजाला इतर समाजाच्या बरोबरीच्या पातळीवर आणण्यासाठी आरक्षणाच्या कुबड्या दिल्या आहेत. माणसाचा विकास झाल्याशिवाय, समाजाचा विकास कधीच होत नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय घटनेत, आरक्षणाची तरतूद केली. हजारो वर्षापासून दबलेल्या समाजाला, प्रतिस्पर्धी युगात जीवन जगण्याची न्युनतम हमी म्हणजे आरक्षण होय. मात्र आरक्षण बंद करण्यात यावे यासाठी, ब्राम्हण्यवाद्यांचे प्रयत्न आहे.

आदिवासी समाजाला 'वनवासी' बनविणे आणि घटनेने दिलेल्या आरक्षण तरतुदीला विरोध करणारे ब्राम्हण्यवाद्यांचे सूत्र, एकच असून दबलेल्या समाजाचे उद्धवस्तीकरणाचे षड्यंत्र आहे. आदिवासी विद्यार्थी शिकून या देशातले साहित्य, ग्रंथ वाचेल, त्यावेळी आदिवासीवर झालेल्या शोषणाची अत्याचाराची त्यांना सत्य बाजू माहित होईल. अशी संघपरिवाराला भितीयुक्त जाण होऊन आपण आजवरी लोकांना मूर्ख बनवित आलो, याचा भांडाफोड होईल असे त्यांना वाटते म्हणून, आदिवासीला आपल्या अस्तित्वाची जाणीव होवून व आपल्यांविरूद्ध संघर्षास सिद्ध होवू नये यासाठी आदिवासींचे 'वनवासी करण' करण्यात येत आहे. शिकलेल्या आदिवासीला आरक्षणामुळे सरकारी कार्यालयात नोकरी लागेल. नोकरीमुळे त्यांच्या दोन वेळचा भाकरीचा प्रश्न सुटेल.

गुलामांचा दोन वेळेच्या भाकरीचा प्रश्न सुटला की, सरळ तो राजसत्तेची मागणी करतो. प्रथम ते आपल्या प्रदेशाच्या राजसत्तेची मागणी, नंतर राज्यावर, राष्ट्रांवर आणि त्यानंतर संपूर्ण 'विश्वावर अधिसत्ता'(४) गाजविण्याची प्रबळ मागणी करतो. या तत्वानुसार आदिवासीला दोन वेळेची भाकर मिळाली की, आपल्या न्याय हक्कासाठी व अधिकारासाठी तो सरळ आर्याविरूद्ध संघर्षास सिध्द होईल. आणि हजारो वर्षापासून भोगित असलेली अधिसत्ता, आदिवासींना हस्तांतरीत करावे लागेल, अशी जबरदस्त भीती ब्राम्हण्यवाद्यांना वाटते. त्यामुळे आदिवासींचे 'वनवासीकरण' केल्यास, त्यांच्या अस्तित्वाची त्याला जाण होणार नाही, आणि आरक्षण बंद झाल्यास दोन वेळेच्या भाकरीही मिळणार नाही, आणि आपल्या विरूद्धचा आदिवासींचा संघर्ष टळेल, म्हणून आदिवासीचे 'वनवासीकरण' करणे व आरक्षणाला विरोध करणे ब्राम्हणवाद्यांचे परम् कर्तव्य ठरले आहे.

दोन वेळेच्या भाकरीचा प्रश्न मिटला की, माणसाच्या 'इगोचा' प्रश्न निर्माण होतो. तो त्याच्या स्वअस्तित्वांचा असून, आपणही माणूस आहोत, आपणास माणसासारखी वागणूक मिळावी, याची आपल्या स्वामीकडे मागणी करतो. स्वअस्तित्वाची जाण होणे, आणि दोन वेळचे भाकर मिळणे, या घटना संघर्षाच्या प्राथमिक अवस्थेतील संघर्ष पेटविणाऱ्या ठिणग्या आहे. आपल्याविरूद्ध संघर्षाची ठिणगी पेटू नये, यासाठी ब्राम्हण्यवाद्यांची प्रतिबंधक तयारी म्हणजे आदिवासीला 'वनवासी' बनवून, त्यांच्या आरक्षणाला विरोध करणे होय. मात्र दोन्ही बाबींचे एकच सूत्र आहे. ते आदिवासीला समूळ नष्ट करणे.

*४) सम्राट अशोक राजाला भिक्कू किस्सा सांगतो, राजाने एका तुकड्यांवर विजय मिळविल्यावर, दुसरा तुकडाही विजयाने प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करतो, व शेवटी संपूर्ण विश्वावर..... राजसत्ता विजयाच्या ह्या तत्वानुसार गुलामाचाही सिध्दान्त असाच आहे. आपल्या स्वामीच्या विरूद्ध उठाव करून, संघर्षास सिध्द होतो, जेव्हा त्याला अस्मितेचे भान येते.*

## वनवासीकरण व मस्जिद उध्वस्तीकरण सूत्र एकच

मर्यादा पुरूषोत्तमांच्या भक्तांनी मुस्लिमांची मस्जिद उध्वस्त केली. मस्जिदबाबतचा वाद, हिन्दुत्ववाद्यांनी अनेक वर्षांपासून उपस्थित केला होता. शेवटी मुसलमानांविषयी असलेला द्वेष व्यक्त केला, तो मस्जिद उध्वस्त करून. मुसलमानांच्या पवित्र ग्रंथानुसार वादग्रस्त जागेवर किंवा दुसऱ्यांच्या मालकीच्या जागेवर मस्जिद बांधणे हे इस्लाम धर्माच्या विरूद्ध आहे. ती जागा इस्लामाचीच असल्याशिवाय मस्जिद उभी होवू शकत नाही. म्हणजे मस्जिद ही मुस्लिमांच्या मालकीच्या जागेवर होती. यात दुमत असण्याचे कारण (इस्लामांच्या धर्म शास्त्रानुसार) नाही, हा एक मुद्दा वेगळा आहे. मुसलमानीयांची मस्जिद उध्वस्तीकरण म्हणजे मुसलमानीयांचे अस्तित्व नाकारणारा हिन्दुत्ववादी प्रवाह समोर येत आहे. या देशात जो कोणी हिन्दु नाही. त्यांच्या अस्मितेचे व संस्कृतीचे अवशेष समूळ-नष्ट करणे हे तंत्र हिन्दुत्ववाद्यांनी मुसलमानांच्या बाबतीत वापरले आहे. याप्रमाणे आदिवासींचे 'वनवासीकरण' करून त्याचे पूर्णत: अस्तित्व नाकारले आहे. या देशात जो कोणी हिन्दू नाही, त्याचे समूळ अस्तित्व नष्ट करणे, याचे प्रमाण, मस्जिद उध्दवस्तीकरण व आदिवासींचे 'वनवासीकरण' या दोन्ही, घटनांवरून स्पष्ट हाते. हिन्दुत्ववाद्यांना निश्चित कळून चुकले आहे की, या देशातले अहिन्दु आदिवासी, बौध्द, मुस्लिम जर एकत्र झाले तर, आपण हजारो वर्षापासून राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रावर सत्ता भोगीत आहोत, याची नुकसानभरपाई देणे भाग पडणार आहे. या देशात जो कोणी हिन्दु नाही, त्याचे पूर्णपणे अस्तित्व नष्ट करून, त्यांना राष्ट्रद्रोही, ठरविण्याचे कारस्थान हिन्दुत्ववाद्यांनी रचले आहे.

## वनवासी व सामाजिक अभिसरणातील वर्गसंघर्ष

वर्ग संघर्षाचा विचार करताना शहरीवर्ग व ग्रामीणवर्ग अशी वर्गवारी लक्षात येते. 'शहरी संस्कृतीची वाढ आदिवासींच्या शोषणांवरून झाल्यामुळे, आदिवासींचे हितसंबंध हे नागरी हितसंबंधाच्या विरोधात असून उभय पक्षातील नाते हे वर्गसंघर्षाचे आहे.'' (आपल्या राजकीय मानसिकतेची पोत - प्रा. सुमंत यशवंत - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ) असे स्पष्टीकरण डाव्या विचारसरणीचे नेते देतात. मात्र वर्गसंघर्षाची भूमिका मांडताना डाव्यांसमोर शहरी आदिवासींचाही प्रश्न आहे.

माणसाला चक्रावून सोडवून टाकणारी गोष्ट म्हणजे एकाच आईच्या उदरातून जन्म घेणारे दोन आदिवासी भाऊ, एक भाऊ उदरनिर्वाहासाठी शहरात जातो, तर दुसरा भाऊ जंगलात (खेडेगावात) जीवन जगतो. शहरातला भाऊ आदिवासी असतो तर, ग्रामीणभागातला, जो जंगलखोऱ्यात राहतो, तो वनवासी? शहरामध्ये नोकरीसाठी आलेल्या आदिवासीचे शोषण, त्यांच्या मालकांकडून, व्यापाऱ्यांकडून, हिन्दुत्ववाद्यांकडून होत असते, तर ग्रामीण व जंगलातल्या आदिवासीचे शारीरिक, मानसिक शोषण, व्यापारी, ठेकेदार, सरकारी अधिकारी, संस्था इ. कडून सर्वस्तरावरून शोषण करण्यात येते. शहरातला असो वा खेड्यातला आदिवासी असो, त्यांच्या शोषणाची प्रक्रिया सारखीच आहे. या शोषण प्रक्रियेतून शहरातला आदिवासी विरूद्ध खेडेगांवातला आदिवासी असा 'वनवासी' या शब्दप्रयोगातून संघर्ष उभा होत आहे. आणि हे हिन्दुत्ववाद्यांना अपेक्षित आहे. शहरातला आदिवासी तो आदिवासी आणि खेड्यातला आदिवासी तो

'वनवासी' असे आदिवासीत दोन वेगवेगळे स्तर निर्माण करण्यांत येत आहे.

डाव्या व उजव्या विचार-सरणीच्या राजकीय संघर्षात्मक प्रक्रियेमध्ये, डाव्या चळवळीतील नेते, आदिवासींना आदिवासी असाच शब्द प्रयोग करतात. कारण त्यांना अभिप्रेत असलेली संघर्षात्मक राजकारणांची प्रक्रिया या शब्दाने अनायसेच व्यक्त होते. उजव्या चळवळीतील नेते, आदिवासींना 'वनवासी' म्हणतात. मात्र डाव्यांकडून, 'वनवासी' शब्द प्रयोगांवर उजव्या चळवळींच्या वृत्तीच्या विरूद्ध कधीच संघर्ष झाला नाही. या उलट डाव्या व उजव्या चळवळीतील नेत्यांमध्ये आदिवासींच्या वनवासीकरणांवर समझौता झालेला दिसतो. डाव्या विरूद्ध उजव्या चळवळीतील जातीनिहाय वर्ग संघर्षाचा मुद्दा विचारात घेतांना आदिवासी माणूस, डाव्या व उजव्या चळवळीच्या नेत्यांच्या जातीतील वर्गाच्या, अतिशय खालचा असा वर्ग भेद प्रकर्षाने जाणवतो. खरे तर आदिवासी हा जाती व्यवस्थेच्या कोठडीत न बसणारा आहे. त्यामुळे त्याची वर्गवारी सर्वात तळाचा तळ असलेला असून, आदिवासी माणूस, आहे तिथे धडपडतो आहे, आपले अस्तित्व व अस्मिता शोधतो आहे.

डाव्या व उजव्याच्या भांडवलदार व कामगारांच्या आणि वर्णव्यवस्थेतील स्वामी-वर्गाच्या बाहेर आदिवासींना ठेवण्यात आले. कारण या सर्वांनी आदिवासीला आपल्या वर्ग संघर्षाचा नायक असे गृहीत धरले आहे. दीर्घ कालाने, आदिवासी माणूस गुलामगिरीच्या विरूद्ध बंड करून उठेल तेव्हा आपल्या विरोधी पक्षातील संघर्षाचा नायक म्हणून उभा होवू नये यासाठी, आदिवासीला 'वनवासी' बनविण्याची प्रक्रिया आहे. आदिवासींच्या 'वनवासी' करणांचे विरूद्ध येथील व्यवस्थेच्या विरूद्ध ज्या ज्या चळवळी आहेत, त्यांचेकडून हल्ले होणे क्रमप्राप्त ठरते. कारण आदिवासी हा येथील व्यवस्थेच्या विरूद्धातील असून, त्याला प्रथम नष्ट केले पाहिजे अशी कठोर भूमिका ब्राम्हणवाद्यांची आहे.

## वनवासी व काही सामाजिक रूढी

आदिवासी समाजामध्ये 'वनवासी' या शब्दाला अशुभ व वर्ज्य मानतात. ज्यांचे कोणीही नाही, आईवडिलांचे मृत्युनंतर दारोदार फिरतात, भीक मागतात, ज्याला कोठेही थारा नाही, आणि कोणाच्या तरी भिंतीच्या आडोश्याला सहारा घेवून, रात्रीचा गुजराण करतात, ते म्हणजे 'वनवासी'

नंदिवाला या जमातीमध्ये, श्रावण महिन्यांत अंगात सुतळीचे गोणपाट किंवा बारदान घालून, संपूर्ण महिनाभर घरप्रपंच सोडून बाहेर पडणाऱ्या माणसास 'वनवासी' म्हणतात. ही वनवासाला जाण्याची प्रथा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. जो कोणी अशा वनवासाला जातो, त्यांच्यात अमृत कुंभ निर्माण होतो, असे त्या जमातींच्या काही लोकांचे म्हणणे आहे. या कालावधीमध्ये पायात चप्पल, अगर बुट घालायचे नाही. कोणाच्यांही घरचे पाणी प्यायचे नाही, पण कोणी जेवण देवू केलेच तरच स्विकारायचे, आणि शक्यतो गावापासून दूर जंगलात झोपायचे. अशा प्रकारची पथ्ये पाळली जातात. वनवासाला गेलेली व्यक्ती केळी खात नाही. (भटक्या विमूक्तांचे अंतरंग-रामनाथ चव्हाण) अशा प्रकारच्या प्रथा हिन्दुत्ववाद्यांनी आदिवासी समाजात रूजविल्या आहेत.

## वनवासी हे गुलामीचे सूत्र

'वनवासी' हा शब्द आदिवासींचे अस्तित्व नाकारणारा आहे. आदिवासीला 'वनवासी' बनविणे

ही राष्ट्रिय स्वयंसेवक संघाची दूरगामी योजना असून आदिवासीला भारतभूमीवरून समूळ नष्ट करण्याचे भयानक षड्यंत्र होय. हिन्दुत्ववाद्यांनी आदिवासींवर हजारो वर्षापासून सत्ता भोगली आहे, त्याचा शेवट कधीतरी होतो हे सर्वश्रृत आहे. निसर्गाचा सिध्दान्तच असा आहे की, एक वर्ग, दुसऱ्या दबलेल्या वर्गावर सत्ता प्रस्थापित करतो, आणि प्रस्थापित वर्ग सत्ता भोगीत असतांनाच, कालान्तराने अधिपत्याखाली दबलेल्या वर्गाकडून आपले वर्चस्व सत्ताधिकारी वर्गावर हळूहळू प्रस्थापित केले जाते. या तत्वाचे पुरेपुरे ज्ञान संघ परिवारांच्या सदस्यांना झाले आहे. दबलेल्या वर्गास प्रस्थापित वर्गाच्या विरूद्ध, संघर्षास सिद्ध होण्यासाठी त्यांचा आत्मसन्मान-जागृती व स्वअस्मितेची चळवळ उभी होणे आवश्यक आहे. 'वनवासी' शब्द प्रयोगांतून आदिवासीची स्वअस्मिता जागृत होत नाही. ती आदिवासीला आदिवासी किंवा 'मूळनिवासी' म्हटल्यानेच जागृत होते. आदिवासीला 'वनवासी' म्हटल्याने, हिन्दुत्ववाद्यांना अनेक उद्देश साधता येतात. ते म्हणजे आदिवासीला गुलामीच्या खायीत ओढून, त्यांना अस्तित्वशून्य बनविणे होय. दुसरे असे की, वनवासी शब्दप्रयोगाने, आदिवासी जंगली लोक आहेत, गुन्हेगार आहेत. त्यांचा या देशावर काहीही हक्क नाही असे चित्र उभे केले जात आहे, तसेच आपण आदिवासी समाजाविरूद्ध हजारो वर्षापासून विघातकी कार्य केले, त्यांच्या माणूसकीला नाकारले, त्यांना अतिशय क्रूरतेची वागणूक दिली, याचा सूड घेण्यास आदिवासीने जागृत होवूच नये, यासाठी 'वनवासी' बनविण्याची हिन्दुत्ववाद्यांची पूर्वयोजना आहे.

गुलामांना एका वेळेच्या भाकरीसाठी रात्रंदिवस गुंतवून ठेवल्यास, आपले शोषण कोण करतो, शोषण कोणत्या स्तरावरून होते, हे त्याला समजून घेण्याची सवडच मिळत नाही. कारण जीवनभर तो एका भाकरीसाठीच गुरफटलेला असतो. गुलामांना गुलामीचे जीवन, हेच माझे विश्व आहे, असा त्याच्या मनावर पगडा निर्माण होतो. याप्रमाणे आदिवासीलाही वाटले पाहिजे की, आपण 'वनवासी' आहोत, वनवासी जीवन आपुले. याप्रमाणे 'वनवासी' असा प्रभावी ठसा आदिवासींच्या मनावर उमटविण्यासाठी 'वनवासी' ही योजना हिन्दुत्ववाद्यांनी साकारली आहे. ज्याद्वारे आदिवासींनी हिन्दुत्ववाद्यांचे आणखी हजारो वर्ष 'आदेशाचे' पालन करीतच रहावे, असे त्यांना वाटते.

स्वतंत्र भारतात, आदिवासींवर हिन्दुत्ववाद्यांकडून 'वनवासी' या भयंकर अशा आदिवासीला उध्वस्त करणाऱ्या योजनेतून, गुलामी लादण्यात येत आहे. आदिवासींची पूर्णपणे अस्मिता नाकारून, येणाऱ्या नवपिढीसमोर, अस्तित्वहिन, प्राणी म्हणून टांगायचे आहे. 'वनवासी' हे गुलामीचे द्योतक असून संघाचे बॉयप्रॉडक्ट आहे. आम्हाला 'वनवासी' म्हटल्याने आमच्या संस्कृतीचा घोर अपमान होतो. आम्ही 'वनवासी' संकल्पना पूर्णतः नाकारतो आहे.

(लेखकाचा पत्ता - एल्. के. मडावी
६, बिजलीनगर, सदर,
नागपूर ४४० ००१)

● ● ●

# आदिवासींच्या शिक्षणातील अडथळा - भाषा

- डॉ. प्र. ल. गावडे

महाराष्ट्रातील शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या कार्यात आदिवासी जमातीच्या शिक्षणाचा प्रश्न हा अनेक गुंतागुंतीमुळे विशेष लक्ष वेधणारा काहीसा जटिल बनला आहे.

आदिवासी जमातीच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीची आणि त्या समाजाच्या जडणघडणीची पार्श्वभूमी या प्रश्नामागे प्रकर्षाने दिसून येते. इतिहासपूर्व काळापासून या भरत खंडात वास्तव करून राहणारे भारतवासी हेच आदिवासी. आदि द्रविडियन्स असा त्यांचा उल्लेख मानव वंशशास्त्रज्ञ करतात. 'अनुसूचित जमाती' असा त्यांचा नामनिर्देश भारतीय राज्यघटनेत करण्यात आलेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींच्या शिक्षणाचा प्रश्न कै. ठक्कर बाप्पा, कै. भिसेगुरूजी, कै. ताराबाई मोडक, अनुताई वाघ इत्यादि व्यक्तींनी अत्यंत परिश्रमाने, निष्ठेने सोडविण्याचा प्रयत्न केला. कोसबाडच्या टेकडीवरून आदिवासी शिक्षणाच्या प्रगतीचे हे प्रवाह महाराष्ट्रात सर्वत्र पसरू लागले. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर (१९६०) आदिवासींच्या शैक्षणिक विकासाला अधिक गती मिळाली. स्वतंत्र आदिवासी विकास संचालनालय, आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी उपयोजना क्षेत्र, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था इत्यादि संस्था आदिवासींच्या सामाजिक शैक्षणिक विकासासाठी स्थापन करण्यात आल्या. १९८६ च्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात आले. इयत्ता पहिली व दुसरीची पाठ्यपुस्तके आदिवासी बोलीभाषांमध्ये तयार करून त्यांचा उपयोग मराठी पाठ्यपुस्तके शिकविताना करण्याची योजना कार्यवाहीत आणली गेली. इतके विविध प्रयत्न करूनही आदिवासींच्या बाबतीत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचे लक्ष्य अजून गाठता आले नाही. १९८१ च्या जनगणनेनुसार आदिवासी जमातीतील पुरूषांच्या साक्षरतेचे प्रमाण ३२.४% होते, तर स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ११.९% इतके होते. दहा वर्षानंतर साक्षरतेच्या प्रमाणात जी थोडी वाढ झाली त्याची नोंद 'ॲन ओव्हरव्हयू ऑफ ट्रायबल रीसर्च स्टडी' (संपादक डॉ. जैन व डॉ. त्रिभुवन) या ग्रंथात करण्यात आली आहे. साक्षरतेचे हे प्रमाण ३६.७७ टक्के इतके वाढले असले, तरी धुळे जिल्ह्यात पुरूष साक्षरतेचे प्रमाण ३२.७४ टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण १३.३४ टक्के एवढेच असल्याचे त्यात नमूद करण्यात आले आहे. याच ग्रंथात भारतातील आदिवासी समाजाच्या व्यापकतेचे वर्णन करताना असे म्हटले आहे, की जगातील आदिवासी जमातीचा संख्यात्मक विचार करता आफ्रिका खंडानंतर भारताचाच क्रमांक लागतो.

१९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या सात कोटी एकोणनव्वद लाख होती. त्यात अनुसूचित जमातीच्या लोकांचे प्रमाण ९.३ टक्के आहे. आदिवासींची वस्ती विखुरलेली आहे. ठाणे जिल्ह्यात वारली, कातकरी, ठाकर, धुळे जिल्ह्यात भिल्ल, मावची, गावीत, कोकणा; नाशिक जिल्ह्यात महादेव कोळी, कोकणा, भिल्ल; यवतमाळ जिल्ह्यात कोलाम,

गोंड; अमरावती जिल्ह्यात कोरकू, तर चंद्रपूर जिल्ह्यात माडिया गोंड अशा आदिवासींच्या विविध जमाती दीर्घ काळापासून महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात राहत आहेत. या आदिवासींचे जीवन कसे असते, त्यांचे राहणीमान कसे असते याचे वर्णन श्री. वाहरू सोनवणे यांनी पुढील शब्दांत केले आहे. ''आदिवासी हा समाज जंगलात, दऱ्याखोऱ्यांत, जंगल कपारीत राहणारा, शिकार आणि कंदमुळे खाऊन जीवन जगणारा, नैसर्गिक आपत्तींनी घाबरून त्यांची पूजा करणारा, प्रश्नांची उकल झाली नाही त्या ठिकाणी प्रश्नांची सर चढून अंध विश्वासाला माहेरघर करणारा, जादूटोणा, भूतचेटकी आदींवर विश्वास ठेवणारा, रोगराईवर जडीबुटी आणि जादू-मंत्राने उपचार करणारा असा आहे. आदिवासींना अस्मिता आहे आपण जंगलाचे राजा असल्याची !'' शिक्षणाबद्दल त्याला विलक्षण तिरस्कार, तिटकारा असल्याचे एका अदिवासी गीतावरून दिसून येते.

'बामणाच्या जन्मा येशी-लिकू लिकू मरशी
वाण्याच्या जन्मा येशी-तोलू तोलू मरशी
पण कातोड्याच्या जन्मा येशी
त जंगलचा राजा होशी.'

दारिद्रय, अज्ञान यांनी ग्रासलेल्या, आधुनिक प्रगतीचा संपर्क नसलेल्या, दोन वेळा जेमतेम भाताची पेज, कंदमुळं, रानातील फळं, नदीतील खेकडे, मासे यांवर गुजराण करणाऱ्या आदिवासी जनांना आपल्या जीवनात शिक्षणापेक्षा जंगलचे राजे म्हणवून घेण्यात जास्त धन्यता वाटते. त्यामुळे शिक्षण घेण्याकडे आदिवासी वळणे किती अवघड आहे याची थोडी कल्पना येते. एकूण शिक्षित, पांढरपेशा माणसाकडून थोडे दूर राहण्याची त्याची प्रवृत्ती. तथापि आदिवासी बुद्धीने अतिशय तल्लख आहेत. कै. अनुताई वाघ यांनी आदिवासी मुलामुलींना शिकवताना आलेले आपले काही अनुभव सांगितले आहेत. अनुताई लिहितात, ''आदिवासी मुले खेळकर, आनंदी चपळ, काटक अशी आहेत. त्यांच्यामध्ये समयसूचकता आहे. बुद्धी तीक्ष्ण आहे. धीटपणा आहे. विनोदबुद्धी आहे.'' हे सर्व गुण आदिवासी विद्यार्थ्यात असूनही आदिवासी कुठे कमी पडतात त्याचाही खुलासा अनुताईंनी केला आहे. त्यांच्या मते ही मुले लवकरच शिकतात; पण तितक्याच लवकर विसरतात. या मुलांच्यात एकाग्रता होत नाही आणि ही मुले फार कमी बोलतात.

आदिवासी मुले कमी का बोलतात, याची पुढील दोन कारणे कै. अनुताईंनी सांगितली आहेत. एक म्हणजे त्यांची बोलीभाषा थोडी वेगळी आहे आणि दुसरे म्हणजे त्यांच्याशी कोणी फारसे बोलतच नाही. म्हणून आम्ही शिक्षकांनी वारली बोलीभाषा समजून घेतली असे सांगून अनुताईंनी आदिवासींच्या शिक्षणातील एका महत्त्वाच्या समस्येची जाणीव येथे करून दिली आहे.

आदिवासींच्या भिन्न भिन्न बोलीभाषांमुळे निर्माण होणाऱ्या शैक्षणिक समस्येची दखल अनेक शिक्षणतज्ज्ञांनी व आदिवासी क्षेत्रात कार्य करणाऱ्या समाजधुरिणांनी घेतली आहे. 'महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती-समस्या व विकास' (संपादक- डॉ. गोविंद गारे) या ग्रंथात यासंबंधी केलेले विश्लेषण मुळातून वाचण्यासारखे आहे. डॉ. गोविंद गारे यांनी या संबंधीचे आपले विचार मांडताना असे लिहिले आहे, की आदिवासी शिक्षणाच्या आणि विचार देवाणघेवाण करण्याच्या संदर्भात एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेणे जरूरीचे आहे. तो म्हणजे आदिवासींच्या बोलीभाषेचा. महाराष्ट्रातील आदिवासी जमातींच्या लहानमोठ्या ७४ बोलीभाषा आहेत. त्यापैकी काही

बोलीभाषा मराठीच्याच पोटभाषा आहेत, तर काही स्वतंत्र आहेत. आदिवासींमधील गोंड, कोरकू, कोलाम, भिल्ल, पावरा, माडिया गोंड या जमातींच्या उदा. वारली, कातकरी, ठाकर, मल्हार कोळी या भाषा मराठीसारख्याच आहेत. तरीदेखील आदिवासी मुलांना दिले जाणारे शिक्षण त्यामुळे प्रथमत: समजण्यात व पुढे स्मरणात ठेवण्यात मुलांना अडचणी येतात. विचार देवाणघेवाण करण्याच्या प्राथमिक पातळीवरील आदिवासी मुलांची ही अडचण त्यांच्यात कमतरतेची व न्यूनगंडाची भावना निर्माण करते.

शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या मार्गातील हा अडसर दूर करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात जी काही मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत त्यांत पुढील दोन तत्वे महत्त्वाची आहेत. १) एक लाखापेक्षा जास्त लोकांची बोली असणाऱ्या आदिवासी भाषांची इयत्ता पहिली व दुसरीची प्राथमिक पुस्तके तयार करण्याचे काम सातव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत पूर्ण केले पाहिजे. २) एकजिनसी समाजाच्या स्थापनेप्रत घेऊन जाणाऱ्या राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गात, जात आणि इतर पूर्वग्रहदूषित संकल्पनांचा अडथळा येऊ नये म्हणून पाठ्यक्रमाच्या आशयाचे पुनर्मूल्यांकन करण्याकरिता केंद्र सरकार व राज्य सरकारे यांनी योग्य त्या पातळीवर समित्या स्थापन कराव्यात. महाराष्ट्र राज्याच्या कृतिकार्यक्रमात आदिवासी बोलीभाषांमध्ये इयत्ता पहिली व दुसरीची पाठ्यपुस्तके व शिक्षक हस्तपुस्तिका तयार करण्याचा विचार व्यक्त करण्यात आला असून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या आदिवासी बोलीभाषा प्रकल्पांकडे हे काम सोपविण्यात आले आहे. त्यातील काही पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

भाषा शास्त्रदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या बोलीभाषेतील या पुस्तकांचे महत्त्व फार मोठे आहे. प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ डॉ. अशोक रा. केळकर यांनी 'आदिवासींच्या प्रश्नांची भाषिक बाजू' या लेखात (समाजप्रबोधन पत्रिका मे-जून १९७२) या विषयावर विस्तृत चर्चा केली आहे आणि त्यात ही द्विभाषिक पाठ्यपुस्तके आदिवासी मुलांना प्रादेशिक भाषा शिकण्याच्या दृष्टीने तसेच शिक्षक, शासक, समाजसेवक आणि सामान्य नागरिक यांची या प्रश्नासंबंधी दृष्टी इष्ट दिशेने बदलण्यासाठी किती आवश्यक आहेत या संबंधीचा आपला अनुकूल अभिप्राय नमूद केला आहे. 'आदिवासी बोलीभाषा प्रकल्प' विभागाच्या प्रमुख आणि आदिवासी बोलीभाषांतील विविध पाठ्यपुस्तकांच्या संपादिका आणि मार्गदर्शिका डॉ. सौ. सुनीता ज. जोशी यांनी आदिवासी बोलीभाषांतील पाठ्यपुस्तक निर्मितीमागील शैक्षणिक बाजू पुढील शब्दांत व्यक्त केली आहे. डॉ. सौ. जोशी लिहितात, ''प्राथमिक शिक्षणाच्या सुरवातीच्या दोन वर्षात जर आदिवासी मुलांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण मिळाले आणि क्रमश: त्यांचा सांधा मराठी या प्रादेशिक भाषेशी जोडता आला, तर श्रवण-संभाषण-वाचन-लेखन ही भाषिक कौशल्ये आदिवासी मुले अधिक चांगल्या प्रकारे आत्मसात करू शकतील. तसे झाले तर त्यांची समज, आकलन शक्ती व अभिव्यक्ती सुधारेल. त्यामुळे अभ्यासात त्यांची गोडी वाढेल आणि गळतीचे प्रमाण कमी होईल.''

आदिवासी विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण सुमारे ७५ ते ८० टक्के आहे. विद्यार्थी टिकून राहण्याचे प्रमाणही असेच चिंतनीय आहे. इयत्ता पहिलीतील पटनोंदणी झालेल्या मुलांपैकी फक्त १० ते १५ टक्के मुलेच इयत्ता दहावीपर्यंत पोचतात. त्यांच्या मातृभाषेतून जर त्यांना प्राथमिक शिक्षण पहिली दोन वर्षे मिळाले. तर या गळतीला काही प्रमाणात बांध घालता येईल.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने आदिवासी विद्यार्थी व त्यांना शिकविणारे शिक्षक यांच्यासाठी जी पुस्तके तयार केली आहेत त्यांतील 'आदिभारती माडिया गोंडी' (पुस्तक पहिले व दुसरे) आणि 'आदिभारती भिली' (पुस्तक पहिले व दुसरे) ही पाठ्यपुस्तके जिज्ञासूंनी अवश्य पाहावीत, अशा शैक्षणिक दर्जाची आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांच्या जीवनानुभवातले प्रसंग त्यात निवडण्यात आले आहेत. आदिवासी भाषांना मूळ लिपी नसल्यामुळे व मराठी भाषेकडे विद्यार्थ्यांना वळविणे सुलभ व्हावे म्हणून ही पुस्तके देवनागरी लिपीत लिहिण्यात आली आहेत. पूरक वाचन म्हणून ही पुस्तके वापरावीत अशी अपेक्षा आहे. प्रत्येक पाठावर स्वाध्याय दिल्यामुळे पुस्तकांची उपयुक्तता अधिकच वाढली आहे. या पाठ्यपुस्तकाशिवाय 'शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका' 'माडिया गोंडी शब्दकोश', 'कोलामी-मराठी शब्दकोश' आणि 'मी रामसी बोलं' या नावाचे वारलीचे सुलभ व्याकरणही प्रसिद्ध करण्यात आले आहे. 'कोलामी' या आदिवासी भाषेतील पाठ्यपुस्तक व शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका तयार करण्यात आली आहे.

आदिवासी जमातीत शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून शासनातर्फे विविध प्रयत्न केले जात आहेत. अनेक आश्रम शाळा, बालवाड्या, संस्कार केंद्रे, निवासी केंद्र शाळा, वसतिगृहे, माध्यमिक शाळा, धंदे व तंत्र शिक्षण शाळा यांच्याद्वारा शैक्षणिक विकासाचे प्रयत्न चालू आहेत. तथापि आदिवासींमधील दारिद्र्याचा प्रश्न फार अस्वस्थ करणारा आहे. ज्या सामाजिक कार्यकर्त्यांनी व शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींनी आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी, सामाजिक प्रगतीसाठी प्रयत्न केले त्यांचे अनुभव याबाबत फार बोलके आहेत. श्रीमती गोदावरी परुळेकर यांनी लिहिलेल्या 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकातील 'कडेकपारीतील वारल्यांचे जीवन' हे प्रकरण वारली जमातीच्या दारिद्र्याचे भीषण दर्शन घडविते. श्रीमती अनुताई लिमये यांनी अनुभवलेला एक प्रसंग असाच मन हेलावून टाकतो. एका आदिवासी पालकाने अनुताईंना उत्तर दिले होते. 'ताई, पोरीला फी माफ, पुस्तक मोफत; पन शाळेत जायचं तर नेसायला योकच फडकं. त्ये कवा धुवायचं ? शाळत कशी जाणार ?'

आदिवासींच्या शिक्षणातील भाषाविषयक अडसर दूर करण्याचा प्रयत्न चालू आहे. पण आदिवासींच्या दारिद्र्याचा प्रश्न हा शिक्षणाच्या सार्वत्रिकीरणातील यक्षप्रश्न आहे. आदिवासींच्या विकासासाठी कार्य करणारे डॉ. गोविंद गारे यांचे एक वाक्य या दृष्टीने मनाला अंतर्मुख करणारे आहे. डॉ. गारे लिहितात, ''दारिद्र्यामुळे आदिवासींचे शिक्षण होत नाही आणि शिक्षण नसल्यामुळे दारिद्र्य त्यांचा पिच्छा सोडीत नाही.''

*(दै. सकाळच्या सौजन्याने)*

● ● ●

# अपेक्षित, तरीही अपूर्व 'आदिभारती'

**- वरूणराज भिडे**

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या बोली भाषेत पुस्तके तयार केल्याचा किंवा केली जात असल्याच्या बातम्या वेळोवेळी प्रसिद्ध झाल्या आहेत. मात्र ती पुस्तके पाहण्याचा कधीच प्रसंग आला नव्हता. 'सकाळ' मध्ये डॉ. प्र. ल. गावडे यांची 'विचार प्राथमिक शिक्षणाचा' ही लेखमाला प्रसिद्ध झाली आहे. त्यात भिली भाषेतील पुस्तकाचा उल्लेख करून पुढील प्रकारचे एक कडवे दिले होते.

पागे पोडूँ आमाँ
सरस्वती माता तुले ।
ओकोल देजे हाता मोडाले ॥ धृ. ॥
ओला भोलानें देजे ओकोले ।
बादे मिलीने लिहूँ ओकोले ।
निखाँ वाचाँ तू मोदोते क्ये हो ।
हिकनाराने सुकी थो वोहो ॥ १ ॥

याच कडव्याचे मराठी रूपांतरही दिलेले होते. ते असे,

पाया पडतो आम्ही
सरस्वती माते तुझ्या ।
बुद्धी दे लहान मोठ्यांना ॥ धृ. ॥
भोळ्याभाबड्यांना दे बुद्धी ।
सगळे मिळून घेऊ अक्कल ।
लिहा-वाचायला तू मदत करते ।
शिकणाऱ्यांना तू सुखी ठेवते ॥ १ ॥

डॉ. गावडे यांनी त्यांच्या संग्रहातील 'आदिभारती भिली पुस्तक दुसरे' हे पुस्तकही दाखविले. 'बालभारती' या सर्वपरिचित पुस्तकासारखेच या पुस्तकाचे स्वरूप असून त्यात पंधरा धडे आणि पाच कविता असे वीस पाठ आहेत. सर्व धडे प्रथम भिली बोली भाषेत आणि नंतर मराठीत दिले आहेत. मार्च १९९५ मध्ये हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.

## बोली भाषेकडून प्रमाण मराठीकडे

थेट मराठी पाठ्य पुस्तक शिकविण्यापेक्षा बोली भाषेवरून प्रमाण मराठीकडे आणण्याची कल्पनाच कौतुकास्पद आहे. तथापि 'बालभारती'च्या पुस्तकाचे द्वैभाषिक स्वरूप करण्याऐवजी स्वतंत्र रचना केली आहे. त्यात 'जयंतराव नटावदकर', 'शिरीषकुमार', 'राजकुमार एकलव्य' वगैरे धडे आणि 'आमू आदिवासीरा' हे गाणे विशेष वाटले. शिरीष्कुमार आणि एकलव्य हे विषय सर्वपरिचित असले तरी 'आपो धुल्ये जिल्लामा नंदुरबार इं मोडो सेहूर हाय' या कारणाने नंदुरबारचा शिरीषकुमार आणि 'विंध्य पहाडमा एक भिल राजो आतो. तिया राजा नाव हिरण्यधनु आथो. तियाल एक पोयरो आथो. तिया नांव एकलव्य आथो.' या कारणाने एकलव्य हे विषय भिल्ल आदिवासींना जवळचे. जयंतराव नटावदकर हे आमदार आणि खासदार होते. भिल्ल जमातीतील ते पहिले पदवीधर आणि पहिले वकील. जंगल कामगारांच्या सहकारी सोसायट्या, शिक्षण संस्था अशा रूपानेही त्यांनी मोठे काम केलेले आहे. आदिवासी भागात रस्ते आणि एसटीच्या सोयी करण्यातही नटावदकरांचा मोठा पुढाकार होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महार समाजातील किंवा सर्वच दलित समाजातील पहिले पदवीधर, पहिले वकील, पहिले बॅरिस्टर, पहिले डॉक्टरेट मिळविणारे, डॉ. पी. सी. पाटील हे मराठा समाजील पहिले मॅट्रिक, शेतीत डॉक्टरेट मिळविणारे पहिले भारतीय, शेतकी कॉलेजचे प्राचार्य आणि शेती संचालक होणारे पहिले भारतीय डॉ. आंबेडकर आणि डॉ. पाटील यांचे जे महत्व आहे. तेच धुळे जिल्ह्यातील भिल्ल आणि इतर आदिवासींच्या दृष्टीने नटावदकरांचे स्थान आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दलचा धडा पुस्तकात समाविष्ट करणे महत्त्वाचे आहे.

मुलांना 'मॅग्ना कार्टा', 'रॉबीनहूड', 'बोस्टन टी पार्टी' माहिती असते, पण 'उमाजी नाईक', 'वासुदेव बळवंत' आणि 'सेनापती बापट' माहित नसतात, याबद्दल खंत व्यक्त केली जाते. तथापि मुलांना 'बोस्टन टी पार्टी' शिकविली जाते. 'उमाजी नाईक' शिकविला जात नाही. या पार्श्वभूमीवर भिली पुस्तकात जयंतराव नटावदकर, संत गुलाममहाराज यांच्यावरील धडे किंवा खाज्या नाईक, रूमाल्या नाईक या बंडखोरांविषयी कविता समाविष्ट करणे, तसे सुचणे कौतुकास्पद आहे.

नटावदकरांविषयी धडा पाहिल्यावर इतर बोलीभाषांची पुस्तके पाहण्याची उत्कंठा वाढली. मात्र पुस्तकांच्या दुकानांमध्ये किंवा 'बालभारती' च्या भांडारामध्ये ही पुस्तके मिळाली नाही. 'बालभारती' चे हल्लीचे संचालक डॉ. वसंत काळपांडे यांनी मात्र ही पुस्तके राज्य शैक्षणिक व संशोधन परिष्ददेत मिळतील असे सांगितले.

त्यानुसार शोध घेतला असता, ती पुस्तके विक्रीसाठी नाहीत, आदिवासींना देण्यासाठी आहेत असे समजले. मात्र तेथे काम करणाऱ्या एका शिपायाने त्याला सापडू शकलेल्या प्रती दिल्या आणि 'विक्रीसाठी नसली तरी ज्याला गोडी आहे त्याला देण्यासाठीच ही पुस्तके आहेत असे सांगितले. पुढे या प्रकल्पाच्या प्रमुख असणाऱ्या डॉ. सुनीता जगन्नाथ जोशी यांनी आणखी काही पुस्तके दिली. त्यामुळे या प्रकल्पात तयार झालेली सर्व नसली तरी बरीचशी पुस्तके पाहण्यास मिळाली.

मिळालेल्या तेरा पुस्तकांत भिली 'आदिभारती' पुस्तक पहिले आणि दुसरे (१९९५), कोरकू 'आदिभारती' पुस्तक पहिले (१९९४), माडिया गोंडी 'आदिभारती' पुस्तक पहिले (१९८४) आणि पुस्तक दुसरे (१९९०), माडिया गोंडी 'आदिभारती' चाचणी प्रत पुस्तक पहिले (१९८०), माडिया गोंडी शब्दकोश (१९९५), कोलामी शब्दकोश (१९८१), वारलीचे सुलभ व्याकरण (१९८०), वारली परिचय पुस्तिका (१९८०), शिक्षक हस्तपुस्तिका - भिली (१९९५) यांचा समावेश होता. वारलीची दोन्ही पुस्तके डॉ. नंदा देशपांडे यांनी लिहिली आहेत.

माडिया गोंडीची चाचणी प्रत डॉ. सुरेंद्रकुमार तिवारी यांनी, कोलामीची चाचणी प्रत डॉ. इंदिरा नायर यांनी आणि डॉ. सुनीता जोशी यांनी केली आहे. बाकीची आठ पुस्तके डॉ. सुनीता जोशी यांनी संपादिका, लेखिका किंवा मार्गदर्शक या नात्याने केली आहेत.

चाचणी प्रती निव्वळ माडिया गोंडी किंवा कोलामी भाषेत आहेत. काही पुस्तकांत बोली भाषेतील धड्याच्या पाठोपाठ मराठी धडा, काही पुस्तकांत आधी सर्व धडे मराठीत, तर काही पुस्तकांत बोली भाषेतील वाक्य आणि कंसात मराठी वाक्य अशी रचना आहे. या प्रयोगांमधील धड्यामागून धडा किंवा

वाक्यामागून वाक्य ही रचना अधिक परिणामकारक वाटते. शिक्षक किंवा विद्यार्थ्यांचे अनुभव काय आहेत हे पाहावे लागेल.

बोली भाषेतील पाठ्य पुस्तकांची चर्चा आणि बातम्या या गोष्टीत गेली दोन-तीन वर्षेच होत असल्या तरी या कामाला सुरवात खूपच पूर्वी म्हणजे १९७५ मध्ये झाल्याचे ही पुस्तके आणि त्यातील प्रस्तावना पाहिल्यावर आढळले.

भिली बोली भाषा मुख्यत: धुळे जिल्ह्यात, माडिया गोंडी चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात, कोलामी यवतमाळ जिल्ह्यात, तर वारली ठाणे जिल्ह्यात बोलली जाते. या भाषांमध्ये केवळ प्रादेशिक भेद आहे असे नव्हे, तर त्या मुळातच वेगळ्या आहेत. मराठी ही भारतीय - आर्य म्हणजे इंडो-आर्यन भाषा कुलातील आहे. वारली ठाकरी, कातकरी, बोली भाषांचे मराठी भाषेशी पुष्कळ साम्य असल्याने त्यांना मराठी शिकणे कठीण जाणार नाही. भिली बोली भाषा भारतीय-आर्य भाषा कुलातील असली तरी मराठीशी कमी साम्य असल्याने भिल्ल मुलांना वारली, ठाकर किंवा कातकरी मुलांपेक्षा मराठी शिकणे कठीण जात असणार, तथापि द्राविड भाषा कुलातील कोलामी, माडिया गोंडी किंवा दक्षिण आशियाई म्हणजे ऑस्ट्रो एशियाटिक भाषा कुलातील कोरकू, नहाली बोली भाषा बोलणाऱ्या मुलांना मराठी शिकणे अवघड जात असणार. घरात इंग्रजीचे वातावरण नसताना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणाऱ्या मुलांचे हाल होतात. त्यापेक्षाही आदिवासी मुलांचे अतोनात हाल होत असतील. अशा प्रकारे अपरिचित भाषा आत्मसात करायची, तिच्यातून शिकायचे आणि 'गुणवत्ता' सिद्ध करायची, अशा अवस्थेला आदिवासी मुले वर्षानुवर्षे तोंड देत आहेत.

## रावण

रावण होते आदिवासींचे आद्य पुरूष
आध्यात्मिक धार्मिक प्रगाढ तत्वज्ञानी
अंतरस्त प्रविण होते नीती शास्त्रांनी
लंकेत राज्य करीत होते, समानतेचे धोरण ठेवोनी ॥ १ ॥

किर्ती रूपास आले स्वकर्तव्यांनी
पांढरपेशा आर्य समाज दुष्ट भावना व्यक्त करतात
दसऱ्याला रावणाची प्रतिमा जाळूनी
होतात विघ्न संतोषी मनी समाधानी ॥ २ ॥

आदिवासी समाज आजतागायत
घोर निद्रिस्त होता, गडद अंधारानी
भविष्यात रावणांची प्रतिमा जाळू देणार नाही.
प्रतिकार करू संघटना, संघर्षानी ॥ ३ ॥

– डी. बी. मंडाले गुरूजी

## "आदिवासी बोली भाषा प्रकल्पां" चा प्रारंभ

अर्थात या प्रश्नाकडे कुणाचे लक्ष गेले नाही, असे मात्र नाही. सिमला येथे १९६७ मध्ये डॉ. हे. श्री. बेळिंगेरी यांनी आदिवासींच्या भाषिक प्रश्नांची चर्चा करणारा निबंध वाचला. त्यात काही विधायक सूचना केल्या होत्या. त्यानंतर डॉ. अशोक केळकर यांनी १९७२ मध्ये 'समाजप्रबोधन पत्रिका' या नियतकालिकात 'आदिवासीं च्या प्रश्नांची भाषिक बाजू' हा लेख लिहिला. त्या वेळी शिक्षणशास्त्र संस्थेच्या संचालक असणाऱ्या डॉ. चित्रा नाईक यांच्या वाचण्यात हा लेख आला आणि त्यातूनच १९७५ मध्ये 'आदिवासी बोली भाषा प्रकल्प' या कामाला सुरवात झाली. प्रारंभी माडिया गोंडी, कोलामी आणि

वारली यांचा अभ्यास केला गेला. तिन्ही भाषांचे शब्दकोश तयार झाले.

भाषा चार टप्प्यांत आत्मसात केली जाते. मूल प्रथम भाषा ऐकते. घरीदारी कानावर पडणारी भाषा ऐकून ते बोलू लागते. चिमखड्या बोलांपासून चुरूचुरू बोलण्याइतकी प्रगती झाली की ते मूल शाळेत जाते. तिथे वाचायला आणि लिहायला शिकते. आदिवासी मुलांना ऐकण्याची आणि बोलण्याची भाषा वेगळी तर वाचण्याची आणि लिहिण्याची भाषा वेगळी असेच शिकावे लागते. त्याऐवजी त्यांची बोली भाषा लिपीबद्ध करून त्यांना वाचायला आणि लिहायला शिकवायचे तसे करताना समांतर पद्धतीने मराठी भाषा शिकवायची आणि तिसरीपासून पूर्ण मराठीतून शिकवायचे, अशी या योजनेप्रमाणे कल्पना होती.

## कोलामी योजना बारगळली

त्यानुसार माडिया गोंडी आणि कोलामी भाषांची वाचन पुस्तके तसेच शिक्षक हस्तपुस्तिका तयार केल्या. प्रारंभी काही मोजक्या शाळांत हा प्रयोग केला गेला त्यातील चाचणी प्रतींचा अनुभव लक्षात घेऊन वाचन पुस्तकांच्या दुसऱ्या चाचणी प्रती अधिक व्यापक रीतीने वापरल्या गेल्या, त्यानुसार आणखी सुधारित प्रत तयार करून सर्व शाळांत वापरण्याची कल्पना होती. त्यानुसार चाचणी प्रतीचे वाचन पाठ देण्यात आले. त्या वेळी माडिया गोंड आणि कोलामी मुलांच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद त्यापूर्वी कधीच दिसला नव्हता, असे शिक्षकांनी सांगितले. मात्र त्यापैकी कोलामी पुस्तकांची योजना पुढे बारगळली आणि कोलामी मुलांचा आनंद हरपला आहे.

आदिवासी बोली भाषांचा प्रकल्प टप्प्याटप्प्याने चाललेला असताना १९८६ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या आदिवासींना त्यांच्या बोलीभाषेतून शिक्षण देण्याचा निर्णय घेतला गेला. १९८१ च्या जनगणनेनुसार एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असणारे आदिवासी असे, आंध -२ लाख ३१ हजार, भिल्ल - ९ लाख ९३ हजार, मावची-१ लाख १० हजार, गोंड -११ लाख ६२ हजार, हळबा - २ लाख ४२ हजार, कातकरी -१ लाख ७४ हजार, कोंकणा - ३ लाख ५२ हजार, कोलाम १ लाख १८ हजार, कोरकू - १ लाख १५ हजार, ठाकर - ३ लाख २३ हजार आणि वारली -३ लाख ६१ हजार. याखेरीज परधान जमातीची संख्या ९८ हजार, पारधी-९५ हजार आणि ढोर कोळी ७७ हजार होती. १९९१ च्या जनगणनेत आणि नंतर परधान आणि पारधींची संख्या लाखाच्या पुढे गेली असावी.

या सोळा समूहांपैकी काहींच्या बोली भाषेचे मराठीशी खूपच साम्य असल्याने त्यांच्यासाठी वाचनपुस्तके करण्याची जरूरी नाही. मात्र शिक्षक हस्तपुस्तिका तयार करणे गरजेचे आहे. भिली, माडिया, गोंडी, कोरकू या भाषांची पुस्तके तयार होऊन मुलांच्या हातात पोचली आहेत. वारली भाषेची पाठ्यपुस्तके करण्याची गरज नाही. तथापि शब्दकोश, व्याकरण, परिचय पुस्तक तयार झाले आहे. मावची जमातीच्या नहाली भाषेची पुस्तके तयार आहेत. कोलामी पाठ्यपुस्तकांची योजना मात्र अक्षरशः ठार मारली गेली. दुसऱ्या चाचणीपर्यंतची पुस्तके तयार होऊन शिकविली जात असताना एका वजनदार आमदाराने 'कोलामींना मराठी येते. त्यांच्यासाठी पुस्तकांची गरज नाही' असे मत व्यक्त केले आणि कोलामी पुस्तकांची योजना बंद पडली. ऑस्ट्रो एशियाटिक कुलातील भाषा बोलणाऱ्यांना इंडो आर्यन कुळातील भाषा येते, असा निवाडा देणारे आमदार

आदिवासी असले तरी कोलामी नाहीत. ते उच्च शिक्षित असले तरी भाषा विषयाचे नाहीत. तरीही भाषा शास्त्रज्ञांचे बहुमत एका शेऱ्याने धुळीला मिळविण्याइतके वजनदार आहेत. आदिवासी असूनही तीन वेळा खुल्या मतदारसंघातून निवडून आले. कॅबिनेट मंत्री झाले. सध्या ते बंडखोर अपक्ष असून सरकारला पाठिंबा देणाऱ्यांपैकी आहेत. त्यामुळे त्यांची मर्जी ही भाषा शास्त्रज्ञांच्या मतापेक्षा प्रभावी ठरली.

## अपूर्व कामाची उपेक्षाच

बरेच काम बाकी असले तरी झालेले काम अपूर्व आहे असे म्हणावे लागेल. आदिवासींच्या बोलीभाषेत पुस्तके तयार करावीत, असे राष्ट्रीय धोरण दहा वर्षापूर्वी ठरले असले तरी महाराष्ट्राखेरीज अन्य प्रांतात अशी पुस्तके झालेले नाहीत. महाराष्ट्रात झालेल्या या अपूर्व कामाची कौतुकाने दखल घेतली जाणे राहोच, उलट सर्व पातळ्यांवर उपेक्षाच चाललेली आहे. शिक्षण खात्यात काम करणाऱ्यांना थोडीफार कल्पना असेल, पण इतरांना या कामाची माहितीदेखील नाही.

परिचित विषयांकडून अपरिचित विषयांकडे नेणे, हे शिक्षणातील एक सूत्र असते. त्यामुळे तिसरीला जिल्हा भूगोल, चौथीला राज्याचा भूगोल, पाचवीला देशाचा भूगोल अशी योजना वर्षानुवर्षे चालली होती. तथापि, भूगोल विषयाचा अधिकारी प्रभावी होतो म्हणून शिक्षण खात्यातील मंडळींनी 'जिल्हा भूगोल' या विषयाची नासधूस केली. वास्तविक जिल्हा भूगोलाच्या धर्तीवर जिल्हा इतिहास, जिल्ह्यातील लेखक-कविंची बालभारती व्हायला हवी होती. साऱ्या विषयांचे ठोकळेबाज अभ्यासक्रम आणि पुस्तके होत असताना 'आदिभारती' च्या प्रत्येक पुस्तकात भाषिक आणि प्रादेशिक वेगळेपण राखले गेले हे विशेष आहे. एका अर्थाने ही उपेक्षा झाली ते बरे झाले. कारण भिल्ल मुलांना जयंतराव नटावदकर, अंबरसिंग महाराज, चोवरी आमास, कोरकूंना चिखलदरा, पोडा; गोंडांना टिपरागड मेट्टा, इर्क मर्रा, पिंडी पंडुम, बहाद्दूर बाबूराव असे परिचित विषय शिकविण्याऐवजी 'बोस्टन टी पार्टी' शिकवून त्यांचे झटपट जागतिकीकरण झाले असते.

तरीही याकामाची उपेक्षा खटकत राहते. ज्या ज्या लोकांना मी ही पुस्तके दाखविली, त्यापैकी कुणालाही असे काम झाल्याचे माहित नव्हते. मात्र पाहून सर्व जण थक्क झाले. सरकारी पातळीवर या उपेक्षेला अनास्थेचे स्वरूप येऊ लागले आहे. झालेले काम अपूर्व आणि कौतुकास्पद आहे. याचे कारण या प्रकल्पात सहभागी झालेले लोक कर्तबगार आणि मेहनती होते. डॉ. अब्दुल सलाम, डॉ. एस. के. डे. डॉ. शेफाली भट्टाचार्य, डॉ. सुजाता, आशा मुंडले, डॉ. सुरेंद्रकुमार तिवारी, डॉ. नंदा देशपांडे, डॉ. इंदिरा नायर आणि डॉ. सुनीता जोशी इतक्या जणांनी या प्रकल्पात वेळोवेळी काम केले आहे. यापैकी काही नावे प्रशासक, लेखक, विचारवंत म्हणून प्रसिद्धही आहेत. आज मात्र डॉ. सुनीता जोशी वगळता कुणीही या त्या प्रकल्पात काम करीत नाही. सर्वांनी अन्य कामे पत्करली आहेत. कुणी प्राध्यापक झाले कुणी संशोधक झाले, कुणी प्रशासक झाले, पण मोठ्या आवडीने स्वीकारलेले बोलीभाषेचे काम नऊ जणांपैकी आठांनी सोडून देण्याचे कारण सरकारने या कामाबद्दल दाखविलेली अनास्था आणि उपेक्षा हेच आहे.

या प्रकल्पाला सुरवात झाली त्या वेळी म्हणजे १९७५ मध्ये प्रकल्पात काम करणाऱ्यांना दरमहा सहाशे रूपये मानधन दिले जात असे. पुढे १९७७ मध्ये त्यात वाढ करून आठशे रूपये मानधन आहे. मानधन म्हणजे पगार, मोबदला किंवा मजुरी नव्हे.

सार्वजनिक स्वरूपाची जबाबदारी घेणाऱ्याला पदरमोड करावी लागू नये, त्याने खर्च केलेल्या वेळेची आणि श्रमाची अंशत: बूज राखली जावी, त्याचा मान राखला जावा अशासाठी लाक्षणिक स्वरूपात मानधन दिले जाते. तथापि या कामासाठी दिले जाणारे मानधन अपमानकारक असू नये. एवढी तरी जाणीव सरकारने ठेवायला हवी होती. सोडून जाणाऱ्या तज्ज्ञांनी आपली नाराजी बोलून दाखविली नसली तरी उपेक्षा आणि अवहेलना करणारे मानधन हे कारण त्यामागे असणार.

चलनवाढ आणि महागाई याची सरकारला जाणीव नसावी. १९७७ चे आठशे रूपये आणि १९९६ चे आठशे रूपये सारखेच मानायचे का? दरमहा आठशे रूपये हे मानधन काही इतर आकड्यांशी तुलना करण्याजोगे आहे. किमान वेतन कायद्याप्रमाणे हॉटेल धंद्यातील अकुशल म्हणजे बश्या विसळणाऱ्याला किमान १ हजार २०५ रूपये द्यावे लागतील. बेकरीतील मजुराला किमान ९२० रूपये द्यावे लागतात. वाहतूक धंद्यातील अडाणी क्लीनरला ९२० रूपये द्यावे लागतात. १९९१-९२ च्या किमतीप्रमाणे नागरी भागात ११ हजार ८५० आणि ग्रामीण भागात ११ हजार ६० रूपये वार्षिक उत्पन्न ही दारिद्र्यरेषा आहे. पीएच.डी झालेल्या भाषाशास्त्रज्ञांचे वार्षिक मानधन ९६०० रूपये होते. याचा अर्थ सरकारला पीएच.डी झालेले भाषाशास्त्रज्ञ हॉटेल, बेकरी, वाहतूक वगैरे धंद्यातील मजुरांपेक्षा कमी उपयोगाचे आणि दारिद्र्यरेषेखाली ठेवण्याजोगे वाटत असले तर इलाज नाही.

अपमानकारक मानधन देण्याचे परिणाम होतात. हा प्रकल्प मंजूर झाला त्या वेळी तेथे स्टेनो, टायपिस्ट, कारकून, शिपाई असा कर्मचारी वर्ग मंजूर झाला. तशा नेमणुका झाल्या. कर्मचारी कायमही झाले मात्र प्रकल्पाच्या कचेरीत कुणी शंभर वेळा गेले तरी तेथे हे कर्मचारी दिसणार नाहीत. त्यांना दुसऱ्याच अधिकाऱ्यांच्या दिमतीला राहावे लागत असते.

## 'बालभारती' ची मनमानी

उपेक्षेचा आणखी एक प्रकार म्हणजे 'बालभारती' चे वर्तन. राज्यातील पाठ्य पुस्तक निर्मितीची मक्तेदारी 'बालभारती' म्हणजे पाठ्य पुस्तक मंडळाकडे आहे. मात्र आदिवासींचे एकही पुस्तक 'बालभारती' ने छापून प्रसिद्ध केलेले नाही. शिक्षण व संशोधन परिषदेने तयार केलेले माडिया गोंडीचे पुस्तक १९९२ मध्ये 'बालभारती' कडे पाठविले. त्या वेळी डॉ. वसंत काळपांडे परिषदेचे संचालक होते. हल्ली डॉ. काळपांडे 'बालभारती' चे संचालक आहेत. त्यांच्याच कारकिर्दीत त्या पुस्तकाची मुद्रण प्रत परत आणावी लागली आणि सध्या ती सरकारी छापखान्यात आहे. डॉ. काळपांडे हे चांगले व कार्यक्षम प्रशासक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या काळात ही उपेक्षा असेल तर प्रतिकूल बोभाटा असणाऱ्या अधिकाऱ्यांनी काय केले असेल?

इतक्या प्रकारे उपेक्षा होऊनही झालेले काम अपूर्व आहे. या विषयाला चालना देणाऱ्या डॉ. अशोक केळकर, डॉ. चित्रा नाईक यांच्यापासून अजूनपर्यंत टिकून राहिलेल्या डॉ. सुनीता जोशी, 'गोडी आहे त्याला देण्यासाठी पुस्तके आहेत' असे म्हणणारा शिपाई या साऱ्यांनी मिळून जे काम केले ते कौतुकास्पद आहे. शिक्षणतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, प्रशासक, आमदार, आदिवासी आमदार-खासदार, शिक्षण मंत्री, आदिवासी कल्याणमंत्री या साऱ्यांनी या कामाची मुद्दाम दखल घेऊन जाहीर कौतुक केले पाहिजे. तशी आस्था दाखविली नाही आणि उपेक्षा वाढत गेली तर मात्र 'आदिवासी बोली भाषा प्रकल्प' हा विषय विस्मरणात गेलेला इतिहास ठरेल.

*(दै. सकाळच्या सौजन्याने)*

● ● ●

# आकाशी झेप घे रे पाखरा....!

**- लक्ष्मण ढवळू टोपले**

तो यशोमंदिराची एक एक पायरी चढत होता. मोकळ्या ढाकळ्या हवेने त्याचा उत्साह द्विगुणीत झाला. त्याची छाती अभिमानाने फुलून आली. अंगातून आदिम रक्त उसळ्या मारू लागलं....तो एका पायरीवर थांबला...आजुबाजूचा परिसर तो न्याहाळू लागला....किती विस्तीर्ण प्रदेश पसरला होता तो!.... क्षितिजाचं मोठं मोठं होत गेलेलं वर्तुळ...अन् वर निळेभोर आकाश....!

'आपण पल्ला किती गाठला? किती उंच आलो आपण?' तो स्वत:शीच म्हणाला - त्याच्या कर्तुत्वाचं त्याचं त्यालाच आश्चर्य वाटलं...''कोण होतो? कुठे होतो? आणि आलो कुठे? कोण झालो? कसं अगदी स्वप्नवत घडलं...! पण स्वप्न तरी कसं म्हणायचं? स्वप्न? छे! वास्तवच की ! इथं येता येता किती दमछाक झाली आपली? रक्ताचं पाणी केलं म्हणून तर आपण या पायरीपर्यंत तरी येऊन पोहोचलोय...!'' मंदिर अगदी जवळ आलं होतं. आता काही पायऱ्या चढल्या की....तो नव्या उमेदीनं पायऱ्या चढू लागला...

वर्तमानातून चालत असतानाही त्याचा भूतकाळ त्याचा पाठलाग करीत होता...

''अरे! अरे!! थांब, मला सोडून तू कुठे चाललास? मला ही तुझ्या संगतीनं येऊ देता!''

''नको ! नको!! तू येऊ नकोस...तू..तू...तिथेच थांब मला तुला गाडून टाकायचंय...वाटल्यास मी तुझी समाधी बांधीन...रोज फुले वाहीन तुझ्या समाधीवर! तू थांब....मरून जा कसा...जा जाऽऽ चालता हो- माझ्या समोरून...मला तुझं तोंडही पाहायचं नाही!'' तो करवादला....

''अरे! असं काय करतोस! माझ्यातूनच तू जन्माला आलास ना? अशी नाळ तोडणं बरं नाही...''

''जा! जा!! पुन्हा असा येऊ नकोस तू मला सतावायला कळलं?'' आणी त्यानं पायरीवर पाय ठेवला....

तरीही तो लक्तरलेला भूतकाळ भेसूर भुतासारखा त्याचा पाठलाग करीत होता....ते लक्तरलेलं जीर्ण...सभोवताली वावरणारी ती अवघड....झिंगलेली....मातकट कपड्यातली...मातीशी एकरूप झालेली ती माणसं....त्याचं ठिगळलेलं गत आयुष्य मांजरीसारखं त्याला ओरबाडू लागलं. त्यानं घासलेटच्या जळणाऱ्या डबड्याच्या प्रकाशात जीवनाचं एक एक पान उलटायला सुरवात केली होती...संस्कारहीन परिसर...कर्दमात रूतलेली ती माणसं एकमेकावर जीवापाड माया करीत....कधी रूसली तर एकमेकांवर शिव्यांची चिखलफेक करीत...बेडकासारखा टणाटणा उड्या मारत रूसत...फुगत...पण पण तो त्याच चिखलातून तरारून उठला होता...चिखलातलेच सत्व शोषूनही चिखलापासून दूर कमलपत्रासारखं त्याचं आयुष्य फुललं होतं....बेकायदेशीरतेला कायद्याचा मुलामा चढवून पांढरपेशी माणसं सर्पासारखी वळसे घालत फुत्कार टाकीत ऐटीत येत...शासकीय कामदार सायबी थाटात येत...तेव्हां मात्र थोडसं आश्चर्य आणि भीतीने वस्ती थरारून जाई...काही माणसं, बेडकांनी

शेवाळात...चिखलात लपून बसावं तशी आपल्या झोपड्यात लपून बसत. काही शेतापोंढ्यावर जात तर काही टणाटण उड्या मारत जंगलात पळू लागत. देवी टोचायला येणाऱ्या डॉक्टरला पाहून घाबरून पळत...त्या लक्तरलेल्या अनघड माणसांविषयी त्याच्या मनात प्रेम..जिव्हाळा होता अन् अजुनही आहे. ती माणसं त्याचीच जीवन सर्वस्व होती अन् आजही आहेत....पुढेही राहतील...काही झालं तरी त्याचंच आदिम रक्त त्याच्या नसानसातून वाहतंय ना! रक्ताचं नातं कसं तुटेल? लक्तरातली डोळ्याचं शिफ्तर झालेली त्याची 'आया' अन् लंगोटी कोपरीबंडीतला त्याचा आबा...यांची त्याला ओढ आहे. त्याच्या आप्तस्वकियांना त्याचं कौतुक आहे. ओढ आहे. त्यालाही त्यांची ओढ आहे...पण...तो...तो आता अशा जागी येऊन पोहोचलाय की, त्याला मागे फिरता येत नाही. त्याची ती जीवाभावाची माणसं मागेच राहिली.. दूर.. दूर त्यांच्यात कळत नकळत दुरावा निर्माण झालाय...त्याचं शल्य त्याच्या उरात सलतंय!

त्या गरीब, भोळ्या भाबड्या अडाणी माणसांच्या सहवासातले ते स्मृतीगंध दरवळू लागतात. तेव्हा त्याचा तो राहात नाही.... त्याचं मन भूतकाळात रेंगाळू लागतं. लक्तरलेलं जिणं जगणाऱ्या, कुडाच्या झोपडीत राहणाऱ्या आंबील, पेज. पिऊन जगणाऱ्या त्या माणसांनी त्याच्यावर जिवापाड प्रेम केलं. आश्रमात राहून शिकत असताना कधीकाळी भेटली तर त्याला खाऊसाठी चार-आठ आणे देत...मुठीतले ते चार - आठ आणे त्याला मायेची उब देत! तो पुढे पुढे जात राहिला तेव्हा त्यांची मनं कशी अगदी हरखून गेली होती! कुणाची दृष्ट लागू नये म्हणून ती माणसं त्याच्यावरून अलाबला ववाळून टाकत तेव्हा त्याला त्यांच्या भोळ्याभावाचं कवतुक वाटत राही. त्यांनी दिलेल्या चटणीभाकरीचा पाहुणचार त्याला गोडगोड लागत होता.

आश्विन कार्तिकात नवं पीक शेतात डोलू लागे तेव्हा त्यांचेही गाल वरवर येत राहत. तारपा वाजवत एखाद्या टारपकर रस्त्यावरून जाऊ लागे. तारप्यातून सूर निघू लागत-

बोचं बोचं पिकलं....खाऊ चांगलं चुंगलं

बोचं बोचं पिकलं....खाऊ चांगलं चुंगलं !

दसरा दिवाळीत ही माणसं तारप्याच्या तालावर एकमेकांचा हात हातात गुंफून नाचत तेव्हा त्याचेही रक्त सळसळे अन् तोही एखाद्या समवयस्क बांडगीचा-तरूणीचा-सालीचा हात धरून नाचायला लागे...त्यावेळी तिचा हात धरल्यावर त्याच्या अंगातून जणू वीज सळसळू लागायची! तीही या कॉलेजात शिकायला गेलेल्या अन् सणाला आलेल्या पांढऱ्या खळीच्या कपड्यातल्या बांडग्याला बघून मोहून जायची! घट्ट-घट्ट हात पकडून जवळिकीचा स्पर्श अनुभवत दुडक्या चालीवर नाचायची! दोघंही घामाघूम होतं तिच्या पायतली कॉपर, ब्रासची पैंजणे छुमक् छुमक् करीत दुडक्या चालीवर वाजू लागत. दोघांच्या अंगातून ओसंडून वाहणारा घामाचा दर्पही त्यांना हवाहवासा वाटायचा! जणू सारं तारूण्यच त्यावेळी उतू जायचं!...

सणावाराला ही माणसं 'धूत' कपडे वापरीत. बाकी इतर वेळी मातकट कपड्यांत! त्यादिवशी कोंबड्या बकऱ्याच्या मटणाचा आस्वाद घेत दारू तोंडाला लावीत. स्वत: पित अन् इतरांना पाजीत. एकमेकांच्या गळ्यात गळा घालून हिंडत. दसरा, दिवाळी, संक्रांत, शिमगा, आखाती, बोहाडा, कवळीभाजी, नागपंचमी, पितरां असे लहानमोठे सण आणि उत्सव त्याच्या

डोळ्यापुढे नाचू लागले. त्या त्या सणाच्या वेळी त्यांनी केलेली मजा त्याला आठवू लागली....

''पाहिलेस! तू...तूच मला जा...जा म्हणतोस! अन् आता तूच माझ्याच-भूतकाळात गुरफटून गेलास की!'' त्याचा भूतकाळ त्याच्यापुढे कमरेवर हात ठेवून विजयोन्मादाने ऐटीत म्हणाला...

''खरंच की! मी...मी...माझ्या माणसांपासून माझी नाळ तोडू शकणार नाही! पण, त्यांच्यात आणि माझ्यात पडलेलं अंतर? कधी तरी कमी होईल का? मी एकटा एकाकी आहे...म्हणूनच मी त्या आठवणीवर जगतोय!''

''अस्सं! म्हणजे तू माझ्यापासून कितीही दूर चाललास तरी माझ्यातच आहेस ना?''

''होय, बाबा होय! तूही चल माझ्यासंग...'' अन् त्याने पायरीवर पाय ठेवला....

यशोमंदिराच्या दिशेनं वाटचाल करीत असता, एक आठवण त्याच्या मनावर मोरपीस फिरवीत गेली. त्याच्या अंगावर रोमांच फुलले पण दुसऱ्याच क्षणी त्या कटू आठवणीने त्याचा चेहरा काळवंडून गेला. जेव्हा तिची अन् त्याची भेट झाली त्यावेळी जणू तो दुतर्फा हिरवळ असलेल्या रस्त्यातून, घनगर्द छायेतून चालला होता. दोन प्रेमीजीव एक झाले होते. त्याचे कर्तृत्व...विशेष म्हणजे त्याचं राजबिंड रूप-रंग पाहून ती मोहरली. तिच्या हृदयात प्रितीची तार झंकारली...तिचे डोळे भिरभिरले. पाखरे फडफडली...गाल आरक्तले...त्याच्याशी लगट करीत ती लडीवाळपणे बोलली. हासली..त्याच्या स्पर्शासाठी ती आसुसली..निमित्ते साधून ती जवळ येत राहिली. दोघेही सागर किनारी, सरूच्या बनात एकमेकांच्या बाहुपाशांत, आलिंगन चुंबनात चिंबचिंब भिजत राहिली.

दोघांनी दोघांच्या डोळ्यांत भावनांचे गीत वाचले...स्वर्ग स्वर्ग म्हणतात तो हाच असं त्याला वाटायला लागलं.. पण जेव्हा तिला त्याची आदिम वंशवेल कळली तेव्हा तिची नजर अनोळखी झाली. ती दूर झाली. ती त्याच्या गावची राहिलीच नाही. तिच्या ओठावरच्या स्मितरेषांच्या ऐवजी कपाळावरच्या आठ्यांच्या जाळ्यांनी त्याचं स्वागत होऊ लागलं...त्याला धक्का बसला होता त्यावेळी.... त्याला वाटलं किती किती स्वप्न रंगविली होती आपण? त्या रस्त्यावरून दोघांनी हातात हात गुंफून चालताना स्वर्गसुध्दा तुच्छ वाटत होता... तोच हिरवळीचा रस्ता असा उजाड भकास वैराण वाळवंट व्हावा ना? त्या दु:खद आठवणीने त्याच्या डोळ्यांत अश्रु तरळले... ''प्रेम असं कापरागत उडून जातं? मग त्या आणाभाका? शपथा? सारं सारं खोटं होतं? सारं ढोंग होतं? तिच्या पांढऱ्या पेशीला (!) माझ्यामुळे धक्का लागणार होता का?'' त्याच्या गळ्यात हुंदका दाटून आला. ''निष्ठूर! विश्वासघातकी!''

''अरे! असा हताश का होतोय? युगायुगापासून हे असंच चालत आलेलं आहे'' कुणी तरी त्याच्या कानात कुजबुजल्याचा त्याला भास झाला. तुझ्यासारखी मीहि यातना भोगलीय! माझ्यात काय कमी होतं? त्या त्या द्रौपदी स्वयंवराच्या वेळी मी पुढे सरसावलो. पाण्यात पाहून फिरत्या माशाचा नयनभेद करण्यासाठी...मी तिला लीलया जिंकल असतं...पण त्याचवेळी ती विद्युल्लतेसारखी कडाडली-' मी त्या सूतपुत्राला वरणार नाही...वरणार नाही! त्यावेळी द्रौपदीनं केलेला माझा अपमान? अवसानघात? आणि तोहि भरसभेत? त्यावेळी माझी मन:स्थिती काय झाली असेल? तुला कळेलही कदाचित त्यानंतरही मी चालतच राहिलो...चालतच राहिलो. मनावर दगड ठेवून!'' तो कुणीतरी म्हणाला...

''पण...माझी व्यथा तुझ्यापेक्षा वेगळी आहे. ती माझ्यावर प्राणापलीकडे प्रेम करीत होती. केवळ मी आदिम वंशाचा आहे म्हणून तिनं मला लाथाडावं? काय आदिम माणसं ही माणसं नाहित?'' तो सात्विक संतापाने म्हणाला. ''तिच्या त्या ढोंगी, मतलबी प्रेमासाठी मी माझ्या सयलाच्या अकृत्रिम प्रेमाला अव्हेरलं...ते रांगड प्रेम मी दूर लोटलं...त्याचं प्रायश्चित तर मला भोगावं लागलं नाही ना?'' अन् त्याच्या दु:खाचा उद्रेक त्याच्या डोळ्यातून पाझरू लागला....

''अरे! असा हवालदिल का होतोयस? उठ, उभा रहा! ते....ते बघ, तुझे यशोमंदीर दिसू लागलय...आता काही पायऱ्या चढायच्या बाकी राहिल्यात... त्या चढल्यास की, तूझं ध्येय काही दूर नाही! उठ, उभा रहा...चालत रहा''

कानात गुंजारव करणारा आणि दिलासा देणारा हा आवाज ऐकून त्याला उभारी आली अन् तो नव्या उमेदीनं एक एक पायरी चढू लागला...पण आपल्याला संजीवन देणारं कोण कुजबुजत होतं. हे कोडं काही त्याला सुटलं नाही...तो जसजसा वरवर चढत होता तसतसे क्षितिजाचं वर्तुळ विस्तारत चाललं होतं....

पण त्याचवेळी कोणीतरी एक बगळा आपलं ढोंगीध्यान विसरून आपल्या पांढऱ्या पेशीच्या आणि पांढऱ्या पिसांच्या अभिमानाने त्याची प्रगती पाहून बकबक करू लागला...तो मत्सराने ओरडला...

'कावळ्याची गरूड झेप!
कावळ्याची गरूड झेप!!'

तो बकबक करू लागला. तसे इतरही बगळे त्याचे अनुकरण करीत ओरडू लागले....

कावळ्याची गरूड झेप? मी...मी...कावळा? मी कावळ्यासारखा आहे? अन् ते? छे ! छे ! त्यांच्यापेक्षा कुठे आहे मी वेगळा?' त्या बगळ्यांचे ओरडणे त्याचे अंत:करण चिरीत गेले. तो नि:शब्द...अंतर्मुख झाला...त्यांच्या स्वकर्तृत्वाच्या स्वाभिमानाला तडा गेला...मी कावळा? कारण मी आदिम वंशाचा आहे म्हणून? अन् हे कोण? बगळे? त्यांच्या अंगावरची पिसे पांढरी आहेत म्हणून? असतीलही ते बगळे पण राजहंस तर नाहीत! माझ्यात त्यांच्यापेक्षा काय कमी आहे? माझ्या कर्तृत्वावर त्यांचा का रोष? उलट त्यांनी माझं कौतुक करायला हवं होतं...' भले शाब्बास' म्हणून माझी पाठ थोपटायला हवी होती. त्याऐवजी माझं कर्तृत्व-माझा-पुरूषार्थ त्यांच्या डोळ्यांत खुपावा ना? आणि माझ्या कर्तृत्वाला त्यांनी संबोधलं..'कावळ्याची गरूड झेप! कावळ्याची गरूड झेप!! झेप! झेप!! कुणाची? कावळ्याची?' तो विषण्णपणे हसला...विमनस्क झाला...त्याच क्षणी तो दैदिप्यमान प्रकाशात न्हावून निघाला. त्याचे डोळे दिपून गेले अन् तो मटकन् खाली बसला. कोणीतरी त्याच्या पाठीवरून मायेनं हात फिरवीत होते...तो चकित झाला. गुडघ्यात घातलेली मान वर केली. डोळे अश्रुंनी भरले होते. त्याने पाहिले, एक तेज:पुंज पुरुष त्याच्यापुढे सस्मित उभा होता! डोक्यावर मुकूट ---मुकूटाला मोरपीस असते तर तो दुसरा कृष्णच शोभला असता! एकेकाळचा कवचकुंडलधारी तो, त्याला सांत्वना देत म्हणाला, 'तुझी व्यथा सनातन आहे. जशी तू आता भोगतोयस तशी मीहि ती भोगलीय! मघाशीच मी तुला सांगितलं, मी किती आघात सोसले ते! मला नाऊमेद करायचा पद्धतशीर प्रयत्न केला गेला. मला माझ्या जातीवरून हिणवलं. सूतपुत्र सूतपुत्र म्हणून मला हेटाळलं. पण मी क्षणभरही डळमळीत झालो नाही.. माझा माझ्या कर्तृत्वावर अढळ विश्वास होता. मी त्या अमृताचा...सूर्याचा पुत्र आहे असंच मला वाटत राहिलं...' त्याला मायेनं थोपटीत

तो म्हणाला- 'उठ! असा हिरमुसला होऊ नकोस पंख कापल्यागत! त्यांच्या हिणवण्याकडे लक्ष देऊ नकोस पंख कापल्यागत! त्यांच्या हिणवण्याकडे लक्ष देऊ नकोस... हत्ती चालत राहतो त्याच्या चालीनं, त्याला कुत्र्यांच्या भुंकण्याची पर्वा नसते... त्यांच्या भुंकण्याची पर्वा न करता बिनदिक्कतपणे तो चालत राहतो. 'उठ! उभा रहा! तू कावळा नाहीस. गरूड आहेस. कावळ्याची झेप झाडाच्या शेंड्यापर्यंत ! गरूडच गगनभरारी घेत असतो. तू गरूड आहेस...गरूड! अन् आकाशी झेप घेताना ठणकावून सांग त्या तथाकथित बगळ्यांना! अगदी हात उंचावून आणि मनगट सरसावून सांग...सांग...जन्माला कुणाच्या पोटी यावं ते कुणाच्या हातात नाही...पण पुरूषार्थ तर आपल्या हाती आहे ना? अन् तो मी तुम्हाला दाखवीन ! कळलं''

त्या अमृत बोलानं त्याच्यात उत्साह संचारला. त्याच्या चेहऱ्यावर तेज विलसू लागलं...तो कवचकुंडल अवशेषधारी सुवर्ण मुकूट धारण केलेला पुरूष त्याच्या पुढ्यात सास्मित उभा होता...तू...तू..तुम्ही?'' त्याच्या तोंडून अभावितपणे उद्गार बाहेर पडले...

''तू मला ओळखलं नाहीस? अरे मी राधेय, चंपानगरीच्या अधिस्थ बाबांचा पुत्र-अंगराज कर्ण!''

ते शब्द त्याच्या कानात घंटेसारखे गुंजत राहिले. साक्षात् कर्णमहाराज आपल्यापुढे उभे असल्याचे पाहून तो भारावून गेला अन् क्षणात् त्यांनी त्यांच्या पायाशी लोळण घेतली...ते दैदिप्यमान तेज हळूहळू विरळ होत जाऊन तो भानावर आला तेव्हा त्याच्यात नवे आत्मिक तेज विलसू लागले अन् झपाटल्यासारखा तो एक एक पायरी चढू लागला...

(लेखकाचा पत्ता : श्री. लक्ष्मण ढवळू टोपले
विक्रमगड, ता. जव्हार, जि. ठाणे ४०१ ६०५)

● ● ●

# लेखकांसाठी

'हाकारा' हे आदिवासी प्रश्नांना वाहिलेले एकमेव मराठी नियतकालिक आहे. यातून आदिवासी जीवन, संस्कृती, साहित्य, सण, उत्सव, कला तसेच आदिवासी कार्यकर्ते व आदिवासीमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव, काही सेवाभावी व्यक्तींची व्यक्तीचित्रणे याशिवाय आदिवासीसंबंधीच्या कथा, कविता इत्यादी सर्व प्रकारच्या लेखनांस प्रसिद्धी दिली जाईल. आपण आपले साहित्य नियमित पाठवीत जावे.

**- संपादक**

# आदिवासी शासकीय आश्रमाशाळा आणि त्यांची वाटचाल

- डी. बी. मंडाले गुरूजी

## १) व्यवस्थापन :

महाराष्ट्रातील काही ठिकाणी अनेक वर्षे होऊनही सुरक्षित शाळा इमारती, व वसतीगृह व्यवस्था, शासकिय रीत्या स्वबळावर व्यवस्था केली गेली नाही. अनेक ठिकाणी गैरव्यवस्था आहे. काही इमारती कच्च्या, नादुरूस्त असून उपयोगाच्या नाहीत. अनेक ठिकाणी भाड्यांनी इमारती घेऊन सोय करून घेतली आहे.

## २) पाण्याची सोय :

शाळेच्या आवारात जवळ पाण्याची सोय केली गेली नाही. अनेक शासकीय आश्रम शाळेवर बैलगाडीने व कावडीने पाणी लांबून नदी, नाल्या, विहिरी वरून सुरू असते त्यात गैरसोय तर आहेच, कधी पाणी असते-नसते. पिण्यांच्या पाण्यांत जंतूनाशक पावडर तर नावालाच आहे. वापर तर नसतोच, मुला, मुलींना आंघोळीला नदी, नाला, विहीर उघड्यावर जंगलात दूर अर्धा एक कि.मी. पर्यंत जावे लागते.

ही बोलकी परिस्थिती आहे. या बाबीवर शासनांचे दुर्लक्ष दिसते. उदासिनता आहे. अधिकाऱ्यांची कार्यवाही ही निष्क्रीयतेची दिसते त्यात सुधारणा करून मिळावी, आदिवासी अबोल, अडाणी, समाज कधीच डोळस झालेला नाही. मुका आहे. त्यांच्या कडे शासकीय प्रक्रियेतून दुर्लक्ष होवू नये.

## ३) वसतिगृह :

शासकिय आश्रम शाळा मधील वसतिगृहाची कार्यपध्दती कोठे, कोठे बरी आहे. काही ठिकाणी गैरसोय अनेक बाबीवर दिसते. त्यात दुरूस्ती व्हावी. अन्नधान्य हे दररोज तांदूळ, दाळ, गहू नियमीत निवडण्यांत यावे. सुपाने पाखडून खडे, अळ्या, सोंडे काढून साफ करावे. भाजीपाला सुध्दा स्वच्छ धुवून, पुसून सडका काढून वापरावा. काही वसतिगृहात तादूळ, गहू, डाळ, पाखडत तर नाहीच निवडत सुध्दा नाहीत. साफ स्वच्छ धूत नाहीत. अनेक शाळेवर भाजीपाला नावाला १५ दिवसात, १ आठवड्यात एक वेळा कसातरी मिळतो. मटनचे तर नाव नाही. फिस्टचे तर नाव नाही. १५ ऑगस्टला, २६ जानेवारीला या दोन वेळा तेही कसेतरी मिळत असेल . बाकी शून्य. पूर्णता दुर्लक्ष, काही आश्रम शाळेवर एक दोन वेळा मटन मिळत असेल यात वाद नाही.

नेहमीच तुरीचे वरण किंवा मुगाचे वरण. आहारात असते परिवर्तन दिसत नाहीत. फेरबदल हवा आहे. त्यात दुरूस्ती होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना जेवण देण्याची पध्दत जी आहे. ती काही, शासकीय आश्रम शाळेवर बेजबाबदार पणे उघड्यावर धुळीत, शाळेच्या अंगणात अव्यवस्थितपणे जेवण विद्यार्थ्यांना दिले जाते. हा गबाळेपणा बहुतेक शाळेवर जाणवतो. या कार्यपद्धतीत बदल आवश्यक आहे.

## ४) शिक्षण :

शिक्षणात तर प्रगती म्हणाल तर समाधानकारक दिसत नाहीत. काही होतकरू शिक्षक जिद्दीने आपआपले शैक्षणिक कार्य करीत असतात. इतर अनेक शाळेवर गैरव्यवस्था सुरू आहे. ज्या शाळेवर मुख्याध्यापक, व्यवस्थापक, कर्तव्यशील असेल.

तेथील शालेय कारभार सुरळीत आहे. बाकी ठिकाणी चालढकलपणा दिसतो.

या सर्व संबंधित बाबीवर शासकिय नियंत्रण अपुरे पडते आहे. यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांची देखरेख दिसत नाही. यावर शासनाचा अंकुश असावा. वारंवार तपासणी होणे आवश्यक आहे.

## ५) शिक्षक व कर्मचारी :

आदिवासी शासकीय आश्रम शाळेवर शिक्षक व इतर कर्मचारी बहुतेक शाळेवर पूर्ण संख्येने आढळतात. क्वचित ठिकाणी शिक्षक एक, दोन कमी आढळतात, कोठे, कोठे, चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांत काही आश्रम शाळेवर कमी पडताना दिसतात.

चतुर्थश्रेणीतील कर्मचारी हे शिक्षकांना ऐकत नाहीत. दारू पिऊन, भांडण, तंटे, अरेरावी करतात. हे चित्र बऱ्याच ठिकाणी दिसते. शालेय कार्यात कुचराई करतात. यावर मुख्याध्यापकांचे लक्ष असावे. पण त्यांनाही चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी मानत नाहीत.

## ६) शालेय साहित्य पुरवठा :

शासकीय आदिवासी आश्रम शाळेत अनेक ठिकाणी सतरंज्या, ब्लँकेट इत्यादिचा अपुरा साठा आढळतो. त्या बाबीकडे शासकीय अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष देऊन सतरंज्या, ब्लँकेट पुरवाव्यात कारण हिवाळ्यात थंडी खूप पडते. बिछायत व पांघरुणाची सोय त्वरीत करावी. पाहिजे तेथे पाठ्यपुस्तके वह्या मिळतात. काही, काही शाळेवर वरिष्ठ अधिकारी भेटी देत नाहीत. ही शासकीय वाटचाल बरोबर दिसत नाही. आकस्मिक भेट अधिकारी देतात. शाळा चौकशी, शालेय कार्याची तपासणीवर शासकीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष दिसते.

आदिवासी शासकीय आश्रम शाळेतील सर्व मुलां/मुलींचा सर्वांगीण विकास साधावा असा शासकीय नियोजित प्रकल्प असतांना अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी संबंधीत यांचे सर्व बाजूने दुर्लक्ष दिसते. हे प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर कळते.

## ७) आरोग्य :

प्रत्येक आदिवासी शासकीय आश्रम शाळेत विद्यार्थ्यांकरिता आरोग्य संरक्षणा खातर छोटे खानी दवाखाना, प्राथमिक उपचारादाखल, औषधी गोळ्या, बोरीक पावडर, खोकला, खॉंसी, ताप उलटी, हगवण यावर तात्पुरता उपचार करण्यासाठी शासनाकडून प्राथमिक औषधी पेटी बॉक्स देण्यात यावे. रात्री बेरात्री दिवसा वेळप्रसंगी कॉलरा, गॅस्ट्रोनी बिमार झाल्यास शहरापासून प्रमुख मोठ्या गावांपासून शाळा लांब जंगलात पहाडात असते, करीता औषधी पेटी देण्याची शासनाकडून व्यवस्था व्हावी.

(लेखकाचा पत्ता : डी. बी. मंडाले गुरुजी
पांढरकवडा, जि. यवतमाळ)

● ● ●

# पुस्तक परिचय

## स्वतंत्र अस्तित्वाचा अंतस्थ हुंकार - 'अहेर'

**- मुक्ता सर्वगोड**

श्रीमती उषाकिरण आत्राम या विदर्भातील नामवंत साहित्यिक आहेत. त्यांच्या अनेक कविता आत्तापर्यंत प्रकाशित झाल्या आहेत. त्यापैकीच एक म्हणजे 'मोट्यारिन' हा गोंडी भाषेतील काव्यसंग्रह. 'अहेर' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. या कथांमधून त्यांनी गोंडी लोकांच्या जीवनाचे काहीसे अस्वस्थ करुन टाकणारे चित्रण केले आहे.

लेखिकेने पहिल्याच कथेत अमानुष अत्याचार की जे, परंपरा रूढींच्या नावावर आजही घृणास्पद सुरू आहे, त्याचं बोलकं चित्रण वाचकांपुढे मांडले आहे. सहजपणे वास्तवात त्यातील एका प्रसंगाचे चित्र 'अहेर' घ्यायला लाज वाटती काय? त्याच्या आवाजात जरब होता. जरब, द्वेष आणि विषयासक्त क्रोधाग्नी होता. त्याला पाहून त्या सर्वांच्या काळजात धस्स झाले. ओंगळ, तांबडे गुंजीसारखे डोळे. गालावर गेटमासारखा मसा, माजोर डुकरासारखी नजर, झुडपासारख्या हलणाऱ्या मिशा. असा गेंड्यासारखा दिसणारा तो हा परंपरा, रूढी याच्या नावाने नवीन नवरीला कुस्करणारा आणि तरीही गरीब गोंड खाली मान घालून पाहणारे याची चि[illegible] आणणारी कथा वाचकाला उसळवित राहते. [illegible]ासपणे विचारात डुंबणारा वाचक संतापतो, आणि कळवळतोही.

'भुक' या कथेत लेखिकेने गोंड लोक अन्न, निरवस्त्र असे जगतात कसे? भयानक पावसात, उध्वस्त झालेल्या खोपटात त्याचे काय होतं? कसं होतं याच आश्चर्य आणि अचंबा वाटणारं करूणाजनक वास्तव चित्र मांडले आहे.

भुक या कथेत सातही मुलांनी अपार आणि अनिवार झालेल्या उपासमारीने टाचा घासून घर्र ऽऽ घर्र आवाज करत तडफडत डोळे मिटले. सातही मुलं मेली कडू जहरी कांदे वाहत्या पाण्याच्या धारेत ठेवून चिंचाआवळीच्या पानात भाजले आणि अर्धकच्चे पोट आगीच्या वणव्याने झोंबाझोंबी करीत खाल्ले न खाल्ले तोच उलट्या...होवू होक करीत गरगरून पडू लागले. तोंडातून फेस काढून, किंचाळू लागले. पोट धरून गडबडू लागले. पाहता पाहता एकच जीवन मरणाचा आकांत ओढाताण...अखेर सातही पिलं डोळे मिटून कायमची भुक मिटवून धरणीवर पडले. भुकेचे विदारक चित्र लेखिकेने प्रसंगोपात, उचीत भाषेत आणि योग्य अस्सल शब्दात वास्तवपणे चितारले आहे.

'परिवर्तन' कथेत लेखिकेने गोंड समाजाची दास्य, दारिद्रय, अज्ञान लाचारी व अमानुष जीवन सर्वपरी अंधश्रध्देनी कचकचून बांधलेले आणि दास्याची निशाणी म्हणजे गळ्यातील जानवे. ते हजारोंच्या संख्येनी एकत्र जमून एकमताने सर्वांनी सर्वासमक्ष तोडून फेकून दिले. नुसता ढिग पडला. लोकांच्या चेहऱ्यावर आनंदाच्या लाटा उसळत होत्या. ''उठा! व्हा ! तैयार!!'' म्हणताच म्हातारा खुशरो धीरगंभीर पिंपळवृक्षाप्रमाणे खणखणीत आवाजात म्हणाला. ''बांधवांनो ! आज आपण क्रांतीची लढाई करण्यासाठी इथं आलोत. परिवर्तनाचे नावच क्रांती. आज बढाईदेवाची शपथ घेवून ''मी गुलामीचा पाश

सर्वासमक्ष तोडून फेकतो''! असे म्हणत गळ्यातले जानवे तोडले. टाळ्यांचा कडकडाट...बडादेवळी जयच्या जल्लोशात सर्व जानवे तोडून फेकत होते. जानवे तोडत होते. सर्व बंधमुक्त होत होते. आम्ही लढाई जिंकली म्हणत आनंदाने नाचत होते. अशा तऱ्हेनी लेखिकेनी आपल्या गोंड समाजाच्या परिवर्तनाच्या क्रांतीचा प्रसंग मोठ्या रोमहर्षक प्रसंगाचे वर्णन करून वाचकालाही गुंतवून ठेवले आहे.

'बाजा' कथेत वेठबिगारीचा पाश पिढ्यानपिढ्या कसा कचकचून ठेवतो. आजाबाप वेठीस वाहून वाहून मरतो पण सावकाराचे कर्ज खंडता खंडत नाही. वेळेप्रसंगी वेठ बिगारास एका सावकाराकडून दुसऱ्यास विकून टाकतो. लग्न झालेल्या पोरीसोबत बिगाऱ्याची बायको काम करायला पाठवितो. बैलगाडीचे धावणे, बैल नसला तर चिखल करायला नांगराला जुंपणे. यासारखा वेठबिगारीचा जिवघेणा अत्याचार आणि शोषणाचा शिकारी अज्ञानी गोंड समाज कसा उणाउणा होत जातो. याचं यथार्थ चित्रण पहायला मिळत.

'संघर्ष' कथेत विधवा तरूण आदिवासी स्त्रीचं जिणं इथला समाज आणि समाजातील पाटील, पोलीस सुशिक्षितपणाचा व सुधारलेपणाचा आव आणणारे, उच्चभ्रू म्हणवून घेणारे पण त्याहीपेक्षा नाटकी, ढोंगी, बेगडी चेहऱ्याचे, कायदा न्याय, नीतिमत्ता गुंडाळून एका लाचार गरीब विधवेवर गिधाडासारखी नजर ठेवून बेअब्रु करणारे. कायदा, न्याय, संरक्षणाची ज्यांचेकडून अपेक्षा करावी तेच पोलीस सुरक्षेऐवजी पोलीस स्टेशन मध्येच बलात्कार करतात. वरून 'बाई तुला स्वप्न पडले असेल.' 'बलात्कार केला असं सांगताना तुला लाज वाटत नाही का?' असे बेशरमकी विकून निर्भत्सना करतात. खरोखरच वाचता वाचता वाचक हेलावून जातो. मन सुन्न होते. सेमली मात्र चिवट, खंबीर अणि निग्रही स्त्री लेखिकेने समर्थपणे उभी केली आहे.

एकूणच या गोंड लेखिकेने मराठी भाषेला गोंडी वळण देवून आपले लेखन पणाला लावून आपल्या समाजाचं ऋण फेडण्याचा रोमहर्षक प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

वाचता वाचता रानावनातल्या दरीपहाडात नद्या, नाले, डोह, प्राणी पक्षी, नाना वृक्षवल्ली, दवादारू, नृत्यसंगीत, गीत, पूजाअर्चा, निसर्गाच्या दुनियेत व गोंडीभाषेच्या प्रांतात घेवून जाणारी लेखिका खरोखरच कौतुकास पात्र आहे. म्हणूनच

॥ बये अशीच पळस व्हयं ग ।
आन् पुढचं व्हयं । पुढंच व्हयं ॥

**'अहेर' (कथासंग्रह)**
**लेखिका - उषाकिरण आत्राम**
*गोंडवाना गोंडी साहित्य परिषद,*
*नागपूर ४४००२४,*
*प्रथम आवृत्ती १९९६*
*किंमत रु. ३०, पृष्ठसंख्या - ८२*

● ● ●

# शहीदवीर सेडमाके बाबूरावजी

- डी. बी.मंडाले गुरूजी

गोंडवानांतील सिंह गर्जना
कानी ऐकावयास गेली इंग्रजांना
शूरवीर बाबूरावांचे शौर्य, धैर्य
एकजूट सामाजिक संघर्षाला पाहून
गेले इंग्रज सैन्य हवालदील होवून
जागृत केले आदिवासी समाजाला
संघटन बळाने, लागले जन संपर्काला ॥ १ ॥

जेरीस आणले सावकार शाही
व्यापारी धंदेवाल्यांना
अन्यायांचा प्रतिकार करण्या
प्रोत्साहित केले आदिम नव तरूणांना
संघटनात्मक लढा देण्या सज्ज झाले
राज्यकारभार चालविण्यांस
अडथळा निर्माण झाला इंग्रजांना ॥ २ ॥

जड झाले देशद्रोही कपटखोर
वर्णभेदी लोकांना
फितुरीने डाव साधुन
पकडून दिले बाबूरावांना
एकवीस ऑक्टोबर अठराशे
अठ्ठावन सालाला
फाशी दिली बाबूराव सेडमाकेना ॥ ३ ॥

चालना दिली समाज संघर्षाला
शहीद अजरामर झाले
समाजकार्य आलें जीवनभर वाट्यालां
शहीद स्मारक आहे, गडचिरोली तहसील
जन्म मूळ गांव घोट्याला ॥ ४ ॥

# बापूच्या देशात

- सोपान सुरकुले

बापूच्या देशा तुला प्रणाम
बापू तू अहिंसेचा पुजारी होतास
आता हे सगळे हिंसेचे भक्त झालेत
दीन दुबळ्यावर अत्याचार करून,
हे स्वत:ला शूर समजतात

खुन्यांसाठी इथे मोर्चे निघतात
निरपराधी लोक मात्र कोठडीत मरतात
सत्तेचे हे वारकरी
भ्रष्टाचाराला दैवत मानतात
या देशात सगळ्यात गरीब,
पुढारी बिचारे !
मताची भीक मागतात,

आणि बापू येथील गरीब केवळ 'रूपायांसाठी'
मारायला नी मरायलाही तयार होतात
आता आदिवासी, दलित, म्हणे
तेच खरे सत्ताधीश आहेत.
पण– बापू स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षानंतरही
ते अजून भुकेचे बळी ठरतात

जाती भेद आता तर राहिलाच नाही
पण – परंपरा टिकवली पाहिजे म्हणून
गोळ्या घालून किंवा ठेचून मारतात,
माणसांना बस, एवढेच बरं बापू....

पत्ता - २४, सुखसागर, नाहुरगाव, मुलुंड (प.)
मुंबई - ४०० ०८०

प्रति,
संपादक 'हाकारा'

स. न. वि. वि.

महाशय,

मी पुढील गोष्टी आपल्या नजरेस आणून देवू इच्छितो.

१) गुजराथ राज्यात कोकणा आणि वारली या जाती आदिवासी जमातीत सरकारमान्य नाहीत त्यामुळे त्यांना कोळी आणि धोडिया या जातींच्या लोकांना ते आदिवासी म्हणून ज्या सोईसुविधा मिळतात तशा कोकणा आणि वारली जातीच्या लोकांना मिळत नाही.

२) स्वातंत्र्य सैनिकांना मिळणाऱ्या सोईसवलती त्या सैनिकाची विधवा बहिण अगर तिची मुले व त्या सैनिकाची मुलगी अगर तिची मुले यास सुविधा मिळतील. मात्र मुलाचा मुलगा - नातू यांचा त्यांत अंतर्भाव नाही. तरी स्वातंत्र्यसैनिकाच्या त्याने सुचविलेल्या दोन व्यक्तींना सुविधा (सर्रास) मिळण्याची तरतूद असावी. तसेच प्रत्येक तालुका पंचायत समितीत दोन स्वातंत्र्य सैनिकास पदसिद्ध सभासदत्व असावे.

३) आदिवासींना जे आर्थिक सहाय्य दिले जाते त्यामुळे त्याची आर्थिक प्रगती किती झाली? का झाली व झाली नाही तर कारणे अडचणी काय? याचे दर ६ महिन्यांनी अवलोकन, मूल्यमापन व्हावे म्हणजे पुढील काळासाठी काय व कसे करावे? यावर विचार करता येईल. आज आदिवासींना द्यावयाचे सहाय्य हे केवळ भीक म्हणून दिल्यासारखे होत आहे.

कळावे,

आपला

**गं. जा. आवारी**

मु. पो. जुनोठी, ता. पेठ, जि. नाशिक